




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १८९ * नांदेड * शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न असफल;
## ११ संचालक बिनविरोध तर १२ जागांसाठी २६ उमेदवार रिंगणात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक पूर्णपणे बिनविरोध करण्याचे सर्वपक्षीय नेत्यांचे प्रयत्न अखेर अपुरे ठरले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी तब्बल १४२ उमेदवारांनी माघार घेतल्याने ११ जागा बिनविरोध आल्या आहेत. यात अनेक मातब्बर नेत्यांचा आणि त्यांच्या कुटूंबियांचा समावेश आहे. मात्र उर्वरित १२ जागांसाठी २६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम असून, ३० जुलै रोजी मतदान होणार आहे.

गेल्या आठवडाभरापासून सर्वपक्षीय नेत्यांकडून निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू होत्या. इच्छुकांची मनधरणी, मतदारसंघनिहाय तडजोडी आणि सर्वसंमतीचा मार्ग काढण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. अनेक मतदारसंघांत यश मिळाले; मात्र काही ठिकाणी इच्छुकांची संख्या अधिक असल्याने थेट लढत अटळ ठरली.

**१२ जागांसाठी थेट लढती**

भटक्या-विमुक्त जाती मतदारसंघात ज्ञानेश्वर दहिफळे विरुद्ध उखडंराव जाधव, इतर मागास प्रवर्गात अनिल पाटील बाभळीकर विरुद्ध ज्ञानेश्वर राजेगोरे, तर अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघात रामचंद्र मुसळे, विजय सोनवणे आणि प्रतिभा एड्रेवार यांच्यात तिरंगी लढत होणार आहे.

तालुकानिहायही अनेक प्रतिष्ठेच्या लढती रंगणार आहेत. भोकरमध्ये माधवराव कदम विरुद्ध राजू पाटील जाधव, मुदखेडमध्ये मारुती जाधव विरुद्ध मारोतराव पाटील व्यवहारे, अर्धापूरमध्ये बालाजी कदम विरुद्ध ज्ञानेश्वर राजेगोरे, नांदेडमध्ये संगीता पाटील डक विरुद्ध अतुल वाघ, धर्माबादमध्ये दत्तू रेड्डी विरुद्ध गोविंद जाधव, देगलूरमध्ये विजयसिंह देशमुख




विरुद्ध श्वेता पाटील, हिमायतनगरमध्ये माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर विरुद्ध माजी नगराध्यक्ष विशाल राठोड, तर हदगावमध्ये चंद्रशेखर कदम विरुद्ध कृष्णा पाटील आष्टीकर यांच्यात थेट सामना होणार आहे.

**हिमायतनगर व भोकरकडे राजकीय नजरा**

यंदाच्या निवडणुकीतील सर्वाधिक प्रतिष्ठेची (पान ३ वर..)

### यांच्यात होणार लढत

| | |
|---|---|
| **विमुक्त जाती भटक्या जमाती** | ज्ञानेश्वर दहिफळे x उकंडराव जाधव |
| **ओबीसी** | अनिल पाटील बाभळीकर x ज्ञानेश्वर राजेगोरे |
| **एससी-एसटी** | रामचंद्र मुसळे-विजय सोनवणे x प्रतिभा एर्डावार |
| **हदगाव** | चंद्रशेखर कदम x कृष्णा पाटील आष्टीकर |
| **हिमायतनगर** | माधवराव पाटील जवळगावकर x विशाल राठोड |
| **देगलूर** | विजयसिंह देशमुख x श्वेता पाटील |
| **धर्माबाद** | दत्तात्रय रेड्डी x गोविंद जाधव |
| **नांदेड** | अतुल वाघ x संगिता पाटील डक |
| **भोकर** | राजू जाधव x माधव कदम |
| **माहूर** | राजेंद्र केशवे x ज्योतीबा खराटे |
| **मुदखेड** | मारोती जाधव x मारोतराव पाटील |
| **अर्धापूर** | बी.आर. कदम x ज्ञानेश्वर राजेगोरे |

## नीट फेरपरीक्षेचा निकाल जाहीर; ११.२१ लाख विद्यार्थी पात्र

### पंजाबसह हरियाणाच्या विद्यार्थ्यांनी मिळविले सर्वाधिक गुण


**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पेपरफुटीनंतर घेण्यात आलेल्या नीट यूजी परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. या परीक्षेत पंजाब आणि हरियाणाच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक गुण मिळविले आहेत. पात्र उमेदवारांमध्ये मुलींनी बाजी मारली असून ११.२१ लाख विद्यार्थी पात्र झाले आहेत.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) गुरुवारी 'नीट (यूजी) २०२६' परीक्षेचा निकाल जाहीर केले आहेत. वैद्यकीय प्रवेश आणि समुपदेशन प्रक्रियेचे वेळापत्रक वेळेवर पार पाडता यावे, यासाठी हा निकाल वेळेत जाहीर करण्यात आला.




भारतातील ५५१ शहरे आणि परदेशातील १४ शहरांमधील ५४४० केंद्रांवर एकूण सुमारे २० लाख उमेदवारांनी 'नीट (यूजी) २०२६' परीक्षा दिली. यापैकी ११.२१ लाख उमेदवार पदवीपूर्व वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुष आणि संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. पंजाबच्या आर्यन गुप्ता आणि हरियाणाच्या पांशुल बन्सल यांनी ७१५ गुणांनी सर्वोच्च गुण मिळविले आहेत.

## मातब्बर बिनविरोध; मात्र खा. अशोकराव चव्हाण यांच्या जुन्या मतदारसंघात निवडणूक



### चिखलीकर बाप-लेक दोघेही बिनविरोध; आ. राठोड, आ. केराम, कवळे गुरूजी, खतगावकर, पुनमताई पवार, बेटमोगरेकर, गोरठेकर, श्रीनिवास चव्हाण, लुटे बिनविरोध

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत अनेक मातब्बर नेत्यांनी बिनविरोध विजय मिळवत बँकेत प्रवेश केला आहे. मात्र खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अधिपत्याखालील भोकर विधानसभा मतदारसंघातील भोकर, अर्धापूर आणि मुदखेड या गटांमध्ये निवडणूक अटळ झाली आहे. याशिवाय हदगाव-हिमायतनगर, देगलूर, नांदेड आणि माहूर या गटांमध्येही चुरशीच्या लढती होण्याची चिन्हे आहेत.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. या प्रयत्नांना अनेक ठिकाणी यशही आले.

माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर हे लोहा मतदारसंघातून बिनविरोध निवडून आले, तर त्यांच्या कन्या तथा भाजप नेत्या प्रणिताताई चिखलीकर-देवरे या कंधार मतदारसंघातून बिनविरोध निवडल्या गेल्या.

नायगाव मतदारसंघातून खासदार रवींद्र चव्हाण यांचे चुलते श्रीनिवास पाटील चव्हाण, मुखेडमधून आमदार तुषार राठोड, तर किनवटमधून आमदार भीमराव केराम यांची बिनविरोध निवड झाली. उमरी मतदारसंघात निवडणुकीची शक्यता असताना अखेर तडजोडीचा मार्ग निघाला आणि कवळे गुरुजी यांनी जिल्हा बँकेत प्रवेश केला. त्यांचे राजकीय प्रतिस्पर्धी कैलास देशमुख गोरठेकर हे 'क' मतदारसंघातून बिनविरोध निवडून आले.

बिलोली तालुक्यातील एका संचालक पदासाठी मीनल पाटील खतगावकर यांची बिनविरोध निवड झाली. तसेच महिला राखीव गटातून अनुक्रमे सुशीलाताई हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर आणि पूनमताई राजेश पवार यांचीही बिनविरोध निवड निश्चित झाली.

मात्र अनेक मातब्बर नेते बिनविरोध निवडून आले असले, तरी भोकर, अर्धापूर, मुदखेड, हदगाव-हिमायतनगर, देगलूर, नांदेड आणि माहूर या मतदारसंघांमध्ये रंगतदार लढती होणार आहेत. या निवडणुकीत कृष्णा पाटील आष्टीकर, जवळगावकर, संगीता पाटील डक, राजेंद्र केशवे, अनिल पाटील बाभळीकर, रामचंद्र मुसळे, दत्तू रेड्डी, माधवराव पाटील मातोडकर आदी उमेदवारांना थेट निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी ३० जुलै रोजी मतदान होणार असून ३१ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे. त्यानंतर जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणात नेमके कोणते मातब्बर वरचढ ठरले, याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## नांदेड जिल्ह्यात दोन दिवस येलो अलर्ट



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दि. १६ जुलै रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १७ व १८ जुलै २०२६ रोजी येलो अलर्ट जारी केला आहे.

दि. १७ व १८ जुलै रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## किनवटमध्ये सुगंधित तंबाखू बाळगल्याप्रकरणी विक्रेत्यावर गुन्हा

### ३ लाख ५२ हजारांची सुगंधित तंबाखू जप्ती प्रकरण

**किनवट (प्रतिनिधी)–** तब्बल ३ लाख ५२ हजारांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याप्रकरणी किनवट पोलिसांनी शब्बीर बशीर तगाले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

किनवट - माहूर रस्त्यावरील कलावती गार्डनच्या शेजारी असलेल्या एम.डी.खान मोटारसायकल गॅरेज या दुकानातून पोलीस उपअधीक्षकांच्या पथकाने बुधवारी तब्बल ३ लाख ५२ हजार रुपयांची सुगंधित तंबाखू जप्त केली होती. याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी




कार्यालयातीत सहायक पोलीस निरीक्षक मनिराम आडे यांच्या तक्रारीवरून किनवट पोलिसांनी आरोपी शब्बीर तगाले याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ सहकलम २६ (२), (iv), २७, ३०, (२), (a), ५९ अन्न सुरक्षा व मानके अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. अधिक चौकशी फौजदार फडेवार करीत आहेत.

## पावसाळी अधिवेशनामध्ये महिला आरक्षण आणि डी लिमिटेशन बिल मंजूर होणार -रामदास आठवले

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रामध्ये महिला आरक्षण आणि डी लिमिटेशन हे बिल येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात आणून कुठल्याही परिस्थितीत हे बिल मंजूर करण्यासाठी भाजप एनडीए सरकार सज्ज झाल्याचे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले.




ना. रामदास आठवले नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता गुरुवारी ते शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी बोलत होते. महिला आरक्षण आणि डी लिमिटेशन बिल कुठल्याही परिस्थितीत मंजूर करून घेण्यासाठी भाजप एनडीए सरकारने पूर्ण तयारी केली आहे. मात्र काँग्रेस व इतर त्यांचे सहकारी पक्ष याला विरोध करत आहेत. काँग्रेसचे राहुल गांधी हे या बिलांबाबत लोकांमध्ये संभ्रम निर्माण करत असून याच बिलाला २०२३ मध्ये त्यांच्यासह सर्वांनी पाठिंबा दिला होता. मात्र आता विरोध करत आहेत. २०२९ च्या निवडणुकांमध्ये महिला खासदारांची संख्या २७३ वर पोहोचणार असून सर्व खासदार ८१६ होणार आहेत. सध्याचे मतदार संघ लोकसंख्येने मोठे झाल्याने ते छोटे करण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. २० जुलै ते १३ ऑगस्ट दरम्यान संसदीय पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. या अधिवेशनात हे बिल मंजूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एकंदरीत भाजप एनडीए सरकार सज्ज झाल्याचे त्यांनी सांगितले.

विकासाच्या दृष्टिकोनातून नरेंद्र मोदी सरकार वेगाने पुढे जात आहे. रस्ते, रेल्वे, विमान, व्यापार यासोबतच मेड इन इंडियावर सरकारचा भर आहे. जागतिक स्तरावर भारताचा व्यापार होत असून शेतकऱ्यांच्या विरोधात सरकार कधीही नाही, परंतु शेतकऱ्यांच्या विरोधात सरकार असल्याचा आरोप विरोधक करत असतात. संविधान बदलाचा फेक नेरेटिव तयार करून लोकसभेत भाजपला मोठे नुकसान सहन करावे लागले. परंतु त्यानंतर महाराष्ट्रामध्ये ठाकरे सेना, आसाम मध्ये तृणमूल काँग्रेसचे खासदार भाजपमध्ये व एनडीएमध्ये दाखल झाले आहेत साहजिकच आता दोन तृतीयांश बहुमत आम्हाला मिळत असल्याने दोन्ही बिल मंजूर होण्यास आता अवघड जाणार नसल्याचे सांगितले.

दिल्ली येथे सुरू असलेल्या सीजेपीच्या आंदोलनाला सोनम वांगचुक यांनी पाठिंबा देऊन ते अमरण उपोषण करत आहेत. नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्री धर्मेंद्र यांनी राजीनामा द्यावा असेही नामदार आठवले म्हणाले. देशामध्ये, राज्यामध्ये मागासवर्गीयावर अन्याय होत आहेत हे जरी सत्य असले तरी त्यातील बारकावे शोधून आरोपींना शिक्षेपर्यंत पोहोचविण्याचे काम सरकार करत आहे.

या पत्रकार परिषदेला विजय सोनवणे, मिलिंद शिराढोणकर, शिवाजी भालेराव, गौतम काळे, उत्तम वाहुळे, बाबासाहेब कांबळे आदींची उपस्थिती होती.



## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा १९ वा दिवस; तब्बल ९ किलो वजन घटलं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा दि. १६ जुलै रोजी १९ वा दिवस होता. त्यांच्या ढासळत्या प्रकृतीसंदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालय सुनावणी घेण्यात आली. या याचिकेत केंद्र आणि दिल्ली सरकारला वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्याचे आणि गरज पडल्यास त्यांना जबरदस्तीने अन्न भरवण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. सोनम वांगचुक २० जूनपासून जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनात सहभागी झाले आहेत.

## भोकरच्या युवकाचा अज्ञातांकडून खून; सुधा नदीच्या काठावर आढळला मृतदेह

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर शहरातील एका २१ वर्षीय तरुणाचा सुधा नदीच्या काठावर गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर शहरातील अशोक कॉलनी भागात राहणारा लक्ष्मण गंगाधर जिंके (वय २१) याचा १ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास सुधा नदीच्या काठावर मृतदेह आढळून आला. अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून त्याचा गळा आवळून खून केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी पोलीस नाईक सागर सुभाष झाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम १०३ (१) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनास्थळाचा पंचनामा करून पुरावे संकलित करण्यात आले असून आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत आहेत. या गंभीर घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

**नांदेडमध्ये जुन्या वादातून दोघांकडून जीवघेणा हल्ला**

जुन्या भांडणाच्या कारणावरून दोन भावांनी मिळून एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना नांदेड शहरातील अमन कॉलनी परिसरात घडली. या हल्ल्यात दरवाजा व दुचाकीचेही नुकसान करण्यात आले असून विमानतळ पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ जुलै २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास अमन कॉलनी येथे शेख दस्तगीर शेख महेबूब (वय ३५) व शेख शकील शेख महेबूब (वय २५) यांनी संगनमत करून फिर्यादी, त्यांचा भाऊ व नातेवाईक यांच्यावर जुन्या वादातून चाकू, विटा आदींच्या सहाय्याने हल्ला केला. या हल्ल्यात जखमींना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच घराच्या दरवाज्याचे व मोटारसायकलीचे नुकसान करून सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मोहम्मद रेहान अली जरीर (वय ३६, रा. अमन कॉलनी, नांदेड) यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यभरात विश्रांती घेतलेल्या पावसाला पुन्हा सुरुवात

### २० जुलैनंतर संपूर्ण राज्यात मान्सून पूर्ण क्षमतेने सक्रिय होण्याचा अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात विश्रांती घेतलेल्या पावसाला पुन्हा सुरुवात होणार आहे. गुरूवारी पुणे, सातारा, घाटमाथा, सांगली, सोलापूर, धाराशिवमध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर २० जुलैनंतर संपूर्ण राज्यात मान्सून पुन्हा पूर्ण क्षमतेने सक्रिय होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे. जुलै महिना अर्धा संपत आला तरी, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अपेक्षित पाऊस झालेला नाही. जुलैच्या सुरुवातीला मुंबई, कोकण, पुणे आणि घाटमाथा परिसरात चांगला पाऊस झाला. मात्र, उर्वरित महाराष्ट्र अजूनही चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे. पावसाअभावी अनेक भागांतील शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

**गोदातीर समाचार**

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**


# महागाईने 'लक्ष्मणरेषा' ओलांडली

देशातील किरकोळ महागाईचा दर जून २०२६ मध्ये ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आणि तब्बल १७ महिन्यांनंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेले ४ टक्क्यांचे मध्यम मुदतीचे लक्ष्य ओलांडले. आकड्यांच्या भाषेत हा बदल फारसा मोठा वाटत नसला, तरी अर्थव्यवस्थेसाठी आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनासाठी तो महत्त्वाचा इशारा आहे. महागाईचे चक्र पुन्हा वेग फिरू लागल्याची ही चिन्हे आहेत. त्याचा परिणाम घरगुती अर्थसंकल्पापासून ते उद्योग, गुंतवणूक आणि व्याजदर धोरणापर्यंत सर्वच स्तरांवर होऊ शकतो. महागाईचा सर्वाधिक फटका हा सामान्य नागरिकांनाच बसतो. पगार किंवा उत्पन्न तितक्याच वेगाने वाढत नसताना अन्नधान्य, भाजीपाला, डाळी आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढल्या की घरगुती बजेटचे गणित बिघडते. टोमॅटो, कांदा, आले आणि विविध डाळींच्या वाढलेल्या किमतींनी आधीच स्वयंपाकघराचा खर्च वाढवला आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. विशेष चिंतेची बाब म्हणजे ग्रामीण भागातील महागाईचा दर ४.७४ टक्के असून तो शहरी भागातील ३.९२ टक्क्यांपेक्षा लक्षणीय जास्त आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे उत्पन्न प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असते. शेती उत्पादनात घट आणि बाजारातील वाढलेल्या किमती यांचा दुहेरी फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसतो. त्यामुळे ग्रामीण क्रयशक्ती कमी होण्याचा धोका निर्माण होतो. महागाई वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. यंदाच्या मान्सूनचा संथ प्रवास, 'एल निनो'चा प्रभाव आणि हवामानातील बदल यामुळे शेती उत्पादनावर परिणाम झाला. दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय स्तरावरील भू-राजकीय तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती आणि वाहतूक खर्च वाढले. खत, इंधन आदी महागल्याने त्याचा परिणाम थेट अन्नधान्य आणि इतर वस्तूंच्या किमतींवर झाला. जागतिक परिस्थिती आणि देशांतर्गत पुरवठा व्यवस्थेतील अडचणी यांचा एकत्रित परिणाम म्हणून महागाई वाढल्याचे स्पष्ट दिसते. महागाई वाढण्याचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे व्याजदर कपातीच्या शक्यता कमी होणे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे उद्दिष्ट महागाईचा दर ४ टक्क्यांच्या आसपास ठेवण्याचे आहे. आता हा दर त्यापेक्षा वर गेल्याने रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करण्याबाबत सावध भूमिका घेण्याची शक्यता आहे. परिणामी गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगांना मिळणाऱ्या कर्जावरील व्याजदर अपेक्षेइतक्या लवकर कमी होणार नाहीत. त्यामुळे ग्राहकांसह उद्योग क्षेत्रालाही त्याचा परिणाम सहन करावा लागू शकतो. तथापि, या परिस्थितीकडे केवळ नकारात्मक दृष्टीने पाहण्याचे कारण नाही. महागाईचा दर अद्याप रिझर्व्ह बँकेच्या २ ते ६ टक्क्यांच्या स्वीकारार्ह मर्यादेत आहे. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेलेली नाही. मात्र, हा इशारा वेळेत ओळखून सरकार आणि रिझर्व्ह बँकेने योग्य पावले उचलण्याची गरज आहे. अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत ठेवणे, साठेबाजीवर कठोर कारवाई करणे, आवश्यक वस्तूंची उपलब्धता वाढवणे आणि कृषी क्षेत्राला बळकटी देणे या उपाययोजना तातडीने राबवाव्या लागतील. दीर्घकालीन दृष्टीने पाहता हवामान बदलामुळे शेतीसमोर उभे राहणारे संकट अधिक गंभीर आहे. सिंचन व्यवस्था, साठवणूक सुविधा, पुरवठा साखळी आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान यामध्ये गुंतवणूक वाढविल्याशिवाय अन्न-महागाईवर प्रभावी नियंत्रण मिळवणे कठीण ठरेल. त्याचबरोबर इंधनावरील आयात अवलंबित्व कमी करणे आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणेही तितकेच आवश्यक आहे. महागाई ही केवळ आर्थिक संकल्पना नसून ती प्रत्येक कुटुंबाच्या जीवनमानाशी थेट संबंधित आहे. त्यामुळे आकडेवारीतील वाढ ही सरकारसाठी सावधगिरीची घंटा समजली पाहिजे. किंमतींवर नियंत्रण, आर्थिक स्थैर्य आणि सर्वसामान्यांच्या खिशाला दिलासा देणारे निर्णय यावरच अर्थव्यवस्थेचा समतोल आणि जनतेचा विश्वास टिकून राहणार आहे. महागाईची 'लक्ष्मणरेषा' ओलांडली असली, तरी योग्य धोरणात्मक हस्तक्षेप आणि प्रभावी अंमलबजावणीद्वारे ती पुन्हा नियंत्रणात आणणे हेच आजचे सर्वात मोठे राष्ट्रीय प्राधान्य ठरले पाहिजे.

# तणावमुक्त तरुण; सशक्त भारत



तरुण...तरुण कोण तर जो मनाने तरुण आहे तो. मग एखादा म्हाताराही असू शकतो. अलिकडे तरुणाची व्याख्या ही वयानुसार केली जाते. ज्याचं वय वीस वर्षाच्या वर व चाळीसच्या खाली ती मंडळी तरुण समजली जातात. परंतु खऱ्या अर्थानं सांगायचं झाल्यास त्या वयातील मंडळी तरुण समजली जावीत काय? याचं उत्तर नाही असं देता येईल. त्याचं कारण आळसपण.

तरुणांच्या आळशीपणाबद्दल सांगायचं झाल्यास अलिकडील तरुण पिढी ही भरपूर आळशी झाली आहे. तसं पाहिल्यास भारतात तरुण पिढी ही वयानं तरुण झाली आहे. ती शिकते. उच्चशिक्षितही होते. परंतु स्वतः आपल्या पायावर उभी राहात नाही तर ती दुसऱ्यांवर अवलंबून राहते. त्या पिढीला वाटतं की, मी उच्चशिक्षित झालो. मला एखाद्या कंपनीत चांगल्या वेतनाची नोकरी लागावी. मी आत्मनिर्भर बनावे.

मी आत्मनिर्भर बनावे. मला एखाद्या कंपनीत नोकरी लागावी वा मला सरकारनं सरकारी नोकरी द्यावी. परंतु कशी देणार. कारण आज आपण सरकारी विभाग जर पाहिले तर तिथं कामाचा बोजवारा वाजतो. अर्थातच सकाळी साडेदहाला लोकं कामावर येतात. ऑनलाईन अंगठा लावण्याची पद्धती प्रचलित असल्यानं हजेरी लावली जाते. त्यानंतर सायंकाळपर्यंत त्यांच्या खुर्चीवर कोणीच सापडत नाही. सायंकाळचे तीनचार वाजले की, मग येतात सर्व. असं सरकारी नोकरदारांचं वागणं. त्यामुळंच सरकारी नोकरी कुणालाही आवडते. कारण कार्यालयीन दौऱ्याच्या नावानं सारं खपतं. कार्यालयातील सरकारी कर्मचारी कुठं गेले. असे विचारल्यावर उत्तर तयारच असतं की, ते दौऱ्यावर गेलेत. परंतु खरी स्थिती अशी असते की ते कार्यालयातून आपल्याच खाजगी कामासाठी निघून गेलेले असतात. ज्यात सामान्य माणसांची कामं अडकतात.

सामान्य माणूस, जो कर भरतो व त्यांच्याच करावर सरकारी कर्मचाऱ्यांचं वेतन होतं. परंतु ज्यावेळेस सामान्य माणसांना कामं पडतात सरकारी कार्यालयात. तेव्हा त्याची कामंच होत नाहीत. कामं करायला सरकारी वेळेस कर्मचारी सापडत नाही अन् कामं होतात तर ती पैसे घेवून वा लाचलुचपत घेवून. हीच तरुणाई आहे आजची. लाच-लुचपत घेणारी, सरकारी नोकरी असेल तर....अन् नसेल तर आईवडिलांचा पैसा घरातच बसून नष्ट करणारी तरुणाई आहे. देशातील तरुण जर असा असेल तर देशाचा विकास अशक्य. तसं पाहिल्यास आजचा तरुण हा वडिलांच्या भरवशावर शिकतो. उच्चशिक्षण देखील वडिलांच्याच भरवशावर घेतो. परंतु शिक्षण घेतल्यानंतर पुरेसा जॉब करुन वडिलांच्या कामाला हातभार लावतांना दिसत नाही. तो शिक्षणानं आत्मनिर्भर होण्याऐवजी फक्त निराधार म्हणून वावरतो. तसं पाहिल्यास त्यानंच उच्चशिक्षण घेतल्यानंतर स्वतः आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता आहे व तो आत्मनिर्भर झाला की त्यानं इतरांच्याही आत्मनिर्भरतेसाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे. परंतु तसं आज होतांना दिसत नाही. कारण आज भावूक पिढी तयार झाली आहे. जी भावूक पिढी सतत तणावात राहते व तीच पिढी सतत तणावात राहून त्याच तणावानं आत्महत्याही करायला मागंपुढं पाहात नाही.

काल असं नव्हतं. कालचे तरुण हे राष्ट्रनिर्माते होते. त्रेतायुगात राम, लक्ष्मण नावाच्या तरुणांनी रावणरुपी विचारांचा विध्वंस केला होता. द्वापरयुगात कृष्ण व बलराम नावाच्या युवकांनी कंस नावाच्या अराजकतेवर विजय मिळवून राज्यात प्रजा-सत्ताक राष्ट्रनिर्मिती केली होती नव्हे तर कालच्याच द्वापरयुगातील पांडव नावाच्या युवकांनी नवीन इंद्रप्रस्थ नावाचं राज्य तयार केलं होतं. कालच्याच तरुण असलेल्या चंद्रगुप्तानं धनानंदचा नाश करुन बलशाली प्रजासत्ताक स्वरुपाचं साम्राज्य व प्रशासन लोकांना दिलं. एवढंच नाही तर त्याच काळातील संघमित्रा आणि महेंद्रनं श्रीलंकेत तरुणपणातच जावून बौद्ध धम्माचा डंका पिटवला व त्या धर्माचा प्रसार केला अन् ज्या बौद्ध धर्माला प्रस्थापित केलं, ते तथागत गौतम बुद्ध. तेही तरुणच होते व तरुणपणातच त्यांच्या राजशी विचारांचा पराभव झाला व जे विचार त्यांना स्फुरले. ते आजही टिकून आहेत आणि आपल्याला त्या विचारांची गरज वाटते. जैन धर्मातही तरुण असलेले वर्धमान महावीर, त्यांनीच जैन धर्म स्थापन केला. याचाच अर्थ पुरातनकाळातही तरुण रक्तांनीच कामे केली.

मध्ययुगीन काळात होवून गेलेले शिवराय. जे चौदा वर्षाचेच होते. तेव्हा त्यांनी तोरणागड सर केला. त्याचं बांकाम केलं. त्यानंतर एकापाठोपाठ एक किल्ले जिंकले. त्याची डागडुगी केली. तिथं राजधान्या वसवल्या. हे सर्व तरुण वयातच घडलं. त्यातच त्याच तरुण वयात संभाजी महाराजांसारखा वीर धर्माभिमानी कामास आला आणि या सर्वांसोबत जे मावळे होते. तेही तरुणच होते. त्यावेळेस ना कोणी आळशी होतं. ना कोणी कामाचा कंटाळा करीत होतं. त्यामुळंच ना कोणाला आत्महत्या करावी लागत होती, ना कुणी तणावात असायचं. त्या काळात काहीही प्राप्त न झालेला कर्णरुपी महापुरुष, ज्याला जीवनात फक्त क्लेशच प्राप्त झाला. तोही आयुष्याच्या शेवटच्या काळापर्यंत आनंदातच होता. त्यानं कवचकुंडलं एका क्षणात दान केली. शिवाय तो थोडासा निराश जरी झाला असला तरी त्यानं हार मानून आत्महत्या केली नाही तर तो लढला व वीरमरण पत्करलं. ही होती त्या काळातील तरुणाई. अन् त्या तरुणाईची ताकदही ज्यांच्या भरवशावर प्रजासत्ताक राज्य तयार झालं. मात्र त्यात काही खडेही होते. ज्यांनी वडिलोपार्जित मिळालेलं राज्य नष्ट केलं. त्यात पहिला क्रमांक लागतो दुर्योधनाचा. ज्यांना त्यांच्या पूर्वजांकडून अगदी सहजपणे राज्य मिळालं. ते टिकवता आलं नाही. ऐन तरुणपणाच्या काळात जे कार्य त्यानं करणे गरजेचं होतं. मात्र ते दुर्योधनाला जमलं नाही. त्यानं आपल्या विचारानं एका प्रशस्त हस्तीनापूर साम्राज्याला नेस्तनाबूत केलं. त्यानंतर बऱ्याच तरुणांनी विलासात जीवन काढून आपली राज्य संपवली. हीच गत आजच्या तरुणाईचीही झालेली आहे. ते उच्चशिक्षण नक्कीच घेतात. परंतु त्याचा फायदा घेतांना दिसत नाहीत. मग उच्चशिक्षण झालं की नोकरीमागं लागतात. त्याच तणावात जगतात व नोकरी नाही मिळाली की, निराशेनं आत्महत्या. काही लोकांच्या आत्महत्या प्रेमात धोके मिळाल्यावर वा प्रेमभंग झाल्यावर. हे तरुणपणातच घडतं. अशी ही आजची तरुणाई. दुर्योधना-सारखं वडिलोपार्जित असलेल्या मालमत्तेवर ऐषआराम भोगणारी. कुठून सशक्त भारत बनेल? हा एक चिंतनशील प्रश्न आहे की ज्याचं उत्तर तरुणांजवळ नाही. देशात अशीच जर परिस्थिती राहिली तर उद्या तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी अख्खा भारतच नष्ट होईल.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आजचे तरुण शिक्षण शिकून कामधंदे करण्याऐवजी शिक्षण शिकून आळशी बनून घरीच आपल्या आईवडिलांचा पैसा उद्ध्वस्त करीत असतात. ती वाट पाहतात आपल्याला सरकारी नोकरी लागेल काय याची. दुसरा मुद्दा असा की, यातीलच काही मुलं ही नशेच्याही आहारी गेलेली दिसतात. ती गांजा, चरस, अफीम यांची नशा करतात. दारु ही पाचवीलाच पुजलेली असते आणि या नशेसोबतच एक मुलगीही. जिच्यावर प्रेम होतं व त्याच प्रेमातून प्रेमभंग व आत्महत्याही. विशेष सांगायचं झाल्यास आजचा तरुण हा सशक्त आहे, जर त्यानं मानलं तर....आजच्या तरुणात गौतम बुद्धासारखी विचारांची ताकद आहे. कृष्ण, बलराम वा रामासारखं शौर्य आहे. शिवाजी महाराजांसारखं ध्येय आहे. तसंच आजच्या तरुणात कौशल्यसुद्धा अपार आहे. तेव्हा तोच देशाचा कायापालट करु शकतो, जर त्यानं खरा विचार केला तर... जर तो तसा विचार करीत नसेल तर तो सतत तणावातच राहील यात दुमत नाही. ज्यातून देशातील कर्तबगार तरुण व त्याच्या तरुणाईला काहीही अर्थ उरणार नाही. यात शंका नाही.


**–अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०


# आंतरराष्ट्रीय न्याय : आदर्श, आव्हाने आणि वास्तव



दरवर्षी १७ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय न्याय दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश जगभरात न्याय, मानवी हक्कांचे संरक्षण, युद्धगुन्हे, नरसंहार आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांबाबत उत्तरदायित्व यांविषयी जनजागृती करणे हा आहे.

आंतरराष्ट्रीय न्याय म्हणजे जगातील राष्ट्रे आणि व्यक्तींना आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत समान उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारी व्यवस्था होय. कोणतेही राष्ट्र किंवा व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नसून, सर्वांनी आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. युद्धगुन्हे, नरसंहार, मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि आक्रमक युद्ध यांसारख्या गंभीर अपराधांवर कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून देणे हा आंतरराष्ट्रीय न्यायाचा मुख्य उद्देश आहे. तसेच मानवी हक्कांचे संरक्षण, जागतिक शांतता आणि कायद्याचे राज्य मजबूत करणे हे त्याचे महत्त्वाचे ध्येय आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्था अधिक न्याय्य आणि शांततामय जगाच्या निर्मितीसाठी आवश्यक आधारस्तंभ मानली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायाचे मूलभूत आदर्श हे समानता, उत्तरदायित्व आणि मानवी हक्कांच्या संरक्षणावर आधारित आहेत. या तत्त्वांनुसार कोणतेही राष्ट्र, नेता किंवा शक्तिशाली व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नसून, सर्वांना आंतरराष्ट्रीय कायद्यापुढे समान मानले जाते.

युद्ध, अत्याचार आणि हिंसा-चारामुळे पीडित झालेल्या नागरिकांना न्याय मिळवून देणे, गंभीर गुन्हे करणाऱ्यांना जबाबदार धरून शिक्षा करणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे आंतरराष्ट्रीय न्यायाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

तसेच राष्ट्रांमधील संघर्ष हिंसेऐवजी संवाद, सहकार्य आणि शांततामय मार्गाने सोडवण्यास प्रोत्साहन देणे, हा आंतरराष्ट्रीय न्यायाचा महत्त्वाचा आदर्श आहे. आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेचे उद्दिष्ट न्याय आणि उत्तरदायित्व प्रस्थापित करणे असले, तरी तिच्यासमोर अनेक गंभीर आव्हाने आहेत. जागतिक राजकारण, राष्ट्रांचे हितसंबंध आणि अंमलबजावणीतील मर्यादा यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायाची प्रक्रिया अनेकदा कठीण बनते.

महासत्तांच्या राजकीय आणि धोरणात्मक हितसंबंधांचा आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेवर प्रभाव पडतो. काही वेळा शक्तिशाली राष्ट्रांच्या भूमिकेमुळे न्यायाच्या समान अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होतात. काही देश आंतरराष्ट्रीय न्यायसंस्थांचे अधिकारक्षेत्र स्वीकारत नाहीत किंवा त्यांच्या निर्णयांना पूर्ण सहकार्य करत नाहीत. त्यामुळे न्यायप्रक्रियेची प्रभावीता मर्यादित होते. गंभीर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना अटक करून न्यायालयासमोर उभे करण्यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी अंमलबजावणी यंत्रणेचा अभाव हे एक मोठे आव्हान आहे. तसेच राजकीय दबाव, दुहेरी निकष असल्याची टीका आणि विविध देशांबाबत वेगवेगळ्या पद्धतीने होणारी कारवाई यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होतात.

युद्धग्रस्त भागांमध्ये पुरावे गोळा करणे, साक्षीदारांचे संरक्षण करणे आणि सत्य घटनांची पडताळणी करणे हीदेखील अत्यंत कठीण प्रक्रिया असते. या सर्व आव्हानांवर मात करून आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्था अधिक निष्पक्ष, प्रभावी आणि विश्वासार्ह बनवणे ही जागतिक समुदायाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेने अनेक प्रसंगी पीडितांना न्याय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. युद्ध, हिंसाचार आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यां-मध्ये दोषींना जबाबदार धरून न्याय देण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. मात्र, आंतरराष्ट्रीय न्यायाची प्रक्रिया अनेकदा दीर्घकाळ चालते. काही महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये पुरावे गोळा करणे, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे आणि दोषींवर कारवाई करणे यासाठी अनेक वर्षे लागतात.

जागतिक राजकारण, महासत्तांचे हितसंबंध आणि राष्ट्रांमधील मतभेद यांचा आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेच्या प्रभावीतेवर परिणाम होतो. सर्व देश न्यायसंस्थांना समान सहकार्य करत नसल्यामुळे अनेक वेळा अंमलबजावणीमध्ये अडचणी निर्माण होतात. तरीही, आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्था ही जागतिक स्तरावर उत्तरदायित्व निर्माण करणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. ती मानवी हक्कांचे संरक्षण, शांतता प्रस्थापित करणे आणि कायद्याच्या राज्याला बळकटी देण्यासाठी आवश्यक भूमिका बजावते.

आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेबाबत भारताची भूमिका संतुलित आणि तत्त्वाधारित राहिली आहे. भारत आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करतो तसेच संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टे आणि तत्त्वांना पाठिंबा देतो. जागतिक शांतता, सहकार्य आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था मजबूत करण्यासाठी भारत सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचवेळी, भारत राष्ट्रीय सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि स्वतंत्र न्यायव्यवस्थेच्या महत्त्वावर भर देतो. कोणत्याही आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत सर्व राष्ट्रांच्या समानतेचा आणि त्यांच्या स्वतंत्र निर्णयक्षमतेचा आदर केला जावा, अशी भारताची भूमिका आहे.

भारत जागतिक न्याय, मानवी हक्कांचे संरक्षण आणि शांततामय संघर्ष निराकरणासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे समर्थन करतो. न्याय, संवाद आणि सहकार्याच्या माध्यमातून अधिक स्थिर व संतुलित जागतिक व्यवस्था निर्माण व्हावी, हा भारताच्या दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्था अधिक प्रभावी, निष्पक्ष आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी काही महत्त्वाच्या उपायांची गरज आहे. जागतिक स्तरावर न्यायाची मूल्ये मजबूत करण्यासाठी सर्व राष्ट्रांनी सहकार्याची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायसंस्थांची विश्वासार्हता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवणे गरजेचे आहे, जेणेकरून सर्व देशांचा या संस्थांवरील विश्वास अधिक दृढ होईल. सर्व राष्ट्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवून आंतरराष्ट्रीय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी मजबूत आणि प्रभावी यंत्रणा विकसित करणे ही काळाची गरज आहे. न्यायप्रक्रियेत पीडितांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांना योग्य न्याय मिळवून देण्याला प्राधान्य दिले पाहिजे. तसेच आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेचा राजकीय हेतूंसाठी वापर होऊ नये आणि न्याय हा निष्पक्ष, स्वतंत्र व समान तत्त्वांवर आधारित राहावा, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा प्रयत्नांमधून अधिक न्याय्य, शांततामय आणि उत्तरदायी जागतिक व्यवस्था निर्माण होऊ शकते.

आंतरराष्ट्रीय न्याय ही केवळ न्यायालयीन संकल्पना नाही, तर शांतता, मानवी हक्क, उत्तरदायित्व आणि जागतिक सहकार्य यांचा पाया आहे. आदर्श आणि वास्तव यांच्यात काही अंतर असले, तरी न्यायव्यवस्था अधिक निष्पक्ष, प्रभावी आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे. न्याय हा केवळ कायद्याचा विषय नसून, तो मानवतेच्या सन्मानाचा आणि शांततामय भविष्याचा आधार आहे.


**–डॉ. आरती राणे**
नांदेड
मो. ९८६०६३८५७५


# शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा!

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते.

विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता, कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात.

विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात.

गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पिल्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते.

जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत.

मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणे=घेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा. पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.


**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# निपुण भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजनबद्ध काम करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## एआय तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर करण्यावर भर




**नांदेड (प्रतिनिधी)–** निपुण भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे आणि परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स मध्ये नांदेड जिल्ह्याला राज्यात अग्रस्थानी आणण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. बदलत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रक्रियेत प्रभावी वापर करून शिक्षक व विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनविण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे १४ जुलै रोजी शिक्षण विभागाच्या निपुण भारत अभियानाच्या आढावा बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अमोल निळेकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, डायटचे अधिव्याख्याते, जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने अधिव्याख्याता शिवाजी साखरे यांनी 'निपुण भारत' विषयावर सादरीकरण केले. तसेच शाळा भेटी व परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स संदर्भात ज्येष्ठ अधिव्याख्याता बालाजी शेळके आणि अधिव्याख्याता डॉ. किरण रापतवार यांनी सादरीकरण केले.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाधारित अध्यापनावर भर देण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंपूर्ण बनविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी शिक्षण विभागाला दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचे आवाहन केले. तसेच शिक्षकांच्या गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला सूचना दिल्या.

विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी निपुण भारत अभियानातील उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच पीजीआयमधील सर्व मानके व उपमानकांमध्ये अपेक्षित गुणप्राप्तीसाठी शाळांनी नियोजनपूर्वक काम करण्याचे मार्गदर्शन केले.

बैठकीचे सूत्रसंचालन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्रीकांत थगनारे यांनी मानले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी मदत कक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य विधीमंडळाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक नुकतेच मंजूर केले आहे. ज्याद्वारे महिला शेतकऱ्यांचे विविध योजनांचे माध्यमातून सक्षमीकरण अभिप्रेत आहे. महिला शेतकऱ्यांचे अनुभव लक्षात घेता आढळून येणाऱ्या विविध अडचणी, मालकी हक्काचे दस्ताऐवज, महसुली प्रकरणे, मालमत्ताविषयक वादांची तत्परतेने दखल घेऊन सुलभतेने सोडवणूक करण्याची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांसाठी मदतकक्ष स्थापन केला आहे.

त्या अनुषंगाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दि. १२ जुलै रोजी बैठक घेण्यात आली. महिला सक्षमीकरण अनुषंगाने महिलांच्या विविध समस्या, सुविधांची उपलब्धता, उद्‌भवणाऱ्या अडचणी व करावयांच्या उपाययोजना अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी प्राधान्याने महिला शेतकऱ्यांचे महसुली प्रकरणे, मालमत्ता विषयक वादांची तत्परतेने दखल घेवून सुलभतेने सोडवणूक करण्यासाठी जिल्हास्तरावर मदत कक्ष कार्यान्वित करणेबाबत त्यांनी निर्देश दिले.

त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी तत्परतेने आदेश निर्गमित करुन जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांसाठी मदतकक्ष स्थापन केला आहे. या मदत कक्षाच्या माध्यमातून महिला शेतकरी यांचे महसूली प्रकरणे, मालमत्ताविषयक वाद इत्यादी अनुषंगाने तक्रारींची दखल घेणे, त्यांची तत्परतेने व विहित पध्दतीने सोडवणूक करण्यासाठी संबंधित विभाग, आस्थापना, कार्यालय यांच्याशी समन्वय साधून अशी प्रकरणे विनाविलंब निकाली काढणे कामी आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार आहे.

महिला शेतकऱ्यांच्या मदतीसाठी या मदत कक्षात एक महिला नायब तहसीलदार, विधी अधिकारी, सहायक महसूल अधिकारी व महसूल सहायकाची नियुक्ती केली आहे.

मदत कक्षात नियुक्त अधिकारी हे सदर कक्षात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून शेतकरी महिलांचे महसूली, मालमत्ताविषयक तक्रारींचे प्राधान्याने निराकरण अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करतील.

नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी महिला शेतकऱ्यांचे महसुली प्रकरणे, मालमत्ताविषयक दावे, तक्रारी अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला शेतकरी मदत कक्षात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# नांदेड जिल्ह्यातील व्यावसायिक वाद दाखल होण्यापूर्वीच सामोपचाराने मिटविण्यात यश

## नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** व्यावसायिक वाद खटल्यापूर्वी मध्यस्थीद्वारे सामोपचाराने मिटविण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला यश आले असून, जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच असा वाद मिटविण्यात आला आहे.

हे प्रकरण नांदेड शहरातील नामांकित शैक्षणिक व धर्मदाय संस्था असलेल्या दोन संस्थेत एका आर्थिक व्यवहारावरून वाद उदभवला होता. सहकार न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी कलम १२-ए, व्यावसायिक न्यायालय अधिनियम-२०१५ प्रमाणे सदरील प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सामोपचाराने मिटविण्याच्या दृष्टीने मध्यस्थीसाठी आले होते. सदरील प्रकरणातील गांभिर्य विचारात घेता, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव शरद जी. देशपांडे यांनी प्रशिक्षीत मध्यस्थ अ‍ॅड. एच. व्ही. संतान यांचा अनुभव पाहता त्यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती केली.

सर्वप्रथम मध्यस्थाने दोन्ही बाजूंचे म्हणने ऐकून घेऊन मध्यस्थी प्रकरण केंद्र, मुंबई यांच्यातर्फे आत्मसात केलेल्या विविध कौशल्यांचा वापर करून दोन्ही बाजुंना सदरील वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी दोन्ही पक्षकारांचा वेळ व पैसा कसा वाचेल यावर त्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांना वाद न्यायालयात दाखल होण्यापूर्वी मिटवून घेण्याचा सल्ला दिला. यासाठी एकत्र, वेगवेगळ्या अशा तीन बैठका झाल्यानंतर मध्यस्थीला यश येऊन दोन्ही बाजुंनी दिनांक १३ जुलै २०२६ रोजी सामोपचाराने वाद मिटविला. सदरील प्रकरण खटल्यापूर्वीची मध्यस्थता प्रकारातले होते. नांदेड जिल्ह्याच्या न्यायिक इतिहासात प्रथमच व्यावसायिक वाद हा मध्यस्थीद्वारे मिटविण्यात यश आले असून, याकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिरकण सचिव शरद जी. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित मध्यस्थ अ‍ॅड. एच. व्ही. संतान यांनी विशेष परिश्रम घेतले.

हाच वाद कोर्टात गेला असता आम्हाला कोर्ट फी भरावी लागली असती. परंतु या साध्या सोप्या सरळ प्रक्रियेमुळे आमचा खूप फायदा झाला. तसेच संस्थेचे नावलौकिक कायम राहिले. – **दीपक शंकरलाल दामा**

खरेतर मी वयोवृध्द असून, कोर्टात जाण्याची फार भिती वाटत होती. परंतू प्राधिकरणाने अतिशय सौजन्याने वागणुक देऊन, मध्यस्थाने सुध्दा समोपचाराची भुमिका पटवून दिल्याने भावी वाद टळला. **–परमजीतसिंग साहीबसिंग**

सदर वाद मिटल्यानंतर शरद जी. देशपांडे यांनी जिल्ह्यातील अशा प्रकारचे वाद असलेल्या व न्यायालयात प्रकरण दाखल होण्याच्या स्थितीत असलेल्या सर्व पक्षकारांना याद्वारे मध्यस्थीद्वारे वाद मिटवून आपसातील कटूता टाळून वेळ व पैसा वाचविण्याचे आवाहन केले आहे.

# नांदेडमध्ये २९ नोव्हेंबरला निराळी समाजाचा राज्यस्तरीय उपवधू-वर परिचय मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** निराळी समाजातील विवाहोत्सुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, समाजातील वैवाहिक संबंध अधिक दृढ व्हावेत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विवाह जुळविण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, या उद्देशाने निराळी समाज सेवा प्रतिष्ठान, नांदेडच्या वतीने राज्यस्तरीय भव्य उपवधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी वामनराव पावडे मंगल कार्यालय, पूर्णा रोड, नांदेड येथे होणार आहे.

या मेळाव्यात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि गुजरात या राज्यांतील निराळी समाजातील विवाहोत्सुक युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा असून, समाजातील कुटुंबांना एकमेकांशी परिचित करून देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

मेळाव्यासाठी युवक-युवतींची नोंदणी सुरू झाली असून, पालकांनी समितीने उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे आपल्या पाल्यांचा बायोडाटा भरावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, राज्याबाहेरील समाजबांधवांनाही याचा लाभ घेता येणार आहे.


उपवधूंच्या बायोडाटा व देणगीसंदर्भातील माहितीसाठी चंद्रकांत कळसकर (९८६०३२६९४२), उपवरांच्या नोंदणीसाठी ९०२१२७७७६९, तर देणगीसाठी पांडुरंग गज्जेवार (९४२३४४१७०८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गुगल फॉर्म भरण्यात अडचण आल्यास संबंधित गाव किंवा शहरातील मेळावा समन्वयक आवश्यक मार्गदर्शन करणार असल्याचेही प्रतिष्ठानतर्फे सांगण्यात आले.

हा मेळावा केवळ वधू-वर परिचयापुरता मर्यादित नसून समाजातील ऐक्य, परस्पर संवाद आणि सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत करणारा उपक्रम ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विनायक कळसकर, मोहन कुरुडे, नारायण पारेकर, चंद्रकांत दामेकर, पांडुरंग गज्जेवार, प्रभाकर पारेकर, बालाजी भांगे, संजय गरुडकर, श्याम एमेकर, उमेश गरुडकर, चंद्रकांत कळसकर आणि रामकिशन इंदूरकर यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. समाजातील सर्व बांधवांनी या राज्यस्तरीय उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन निराळी समाज सेवा प्रतिष्ठान, नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रा. शशिकांत रामगिरीवार यांना पीएच.डी. प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)–** अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस (नेसुबो) महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाचे प्राध्यापक शशिकांत चंद्रकांतराव रामगिरीवार यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. रामगिरीवार यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गांच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा विभाग या विषयावर संशोधन केले असून, त्यांनी हे संशोधन कार्य प्रा. डॉ. विजय लक्ष्मण तरोडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण केले.

# नांदेड मेमन समाजातर्फे एसआयआर फॉर्म भरण्यासाठी जनजागृती अभियान सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील समस्त मेमन समाजाच्यावतीने नागरिकांच्या सोयीसाठी एसआयआर फॉर्म भरण्याबाबत विशेष जनजागृती व मदत अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान १० जुलै ते २५ जुलै दरम्यान सुरू असून मेमन समाज व विविध मोहल्ल्यांतील सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सर्व समाजातील नागरिकांसाठी एकाच छताखाली फॉर्म वितरण व मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मेमन फंक्शन हॉल येथे बीएलओ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नागरिकांना एसआयआर फॉर्म वितरित करण्यात येत आहेत. तसेच फॉर्म भरण्याबाबत आवश्यक मार्गदर्शनही करण्यात येत आहे. कय्युम प्लॉट, साई नगर, खोजा कॉलनी, इतवारा आदी परिसरांतील नागरिकांना फॉर्मचे वितरण सुरू आहे.

ज्या नागरिकांनी अद्याप एसआयआर फॉर्म घेतलेले नाहीत, त्यांनी लवकरात लवकर फॉर्म घेऊन भरावेत व संबंधित विभागाकडे जमा करावेत, असे आवाहन मेमन समाजातर्फे करण्यात आले आहे. फॉर्म भरण्यात कोणतीही अडचण असल्यास मोहल्ल्यातील सामाजिक कार्यकर्ते नागरिकांना मोफत मदत करीत आहेत.

या जनहिताच्या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नांदेड समस्त मेमन जमात व नांदेड यूथ कमिटी यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# नायगाव-नरसीत शाळा, कॉलेज परिसरात रोडरोमिओंचा वावर वाढला

## पालक, शिक्षकांत संताप; कारवाईची मागणी

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –नायगाव आणि नरसी शहरातील शाळा, महाविद्यालये व खासगी शिकवणी वर्गांच्या परिसरात शाळा सुरू होण्याच्या, मधल्या सुट्टीच्या आणि शाळा सुटण्याच्या वेळेत भरधाव दुचाकीस्वार व रोडरोमिओंचा वावर वाढल्याने विद्यार्थिनी, महिला आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षणासाठी नायगाव व बिलोली तालुक्यातील हजारो विद्यार्थी या शहरांत येत असल्याने शैक्षणिक परिसरात सुरक्षित वातावरण राखण्याची गरज व्यक्त होत आहे.

काही तरुणांकडून भरधाव वेगाने दुचाकी चालविणे, एका वाहनावर तिघे-चौघे बसून फिरणे, शाळा व क्लासेस परिसरात वारंवार फेऱ्या मारणे, कट मारणे तसेच टवाळकीचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी पालकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे विशेषतः विद्यार्थिनी आणि महिलांना असुरक्षित वाटत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शाळा, महाविद्यालये आणि क्लासेस परिसरात नियमित पोलीस गस्त वाढविणे, साध्या वेशातील पथके तैनात करणे तसेच भरधाव दुचाकीस्वारांची विशेष तपासणी मोहीम राबवून वाहनांचे आरसी बुक, ड्रायव्हिंग लायसन्स व इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी, अशी मागणी पालक, शिक्षक आणि नागरिकांकडून होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईबरोबरच आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

नुकतेच जिल्ह्याचा पदभार स्वीकारलेल्या पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी शाळा-कॉलेज परिसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष मोहीम राबवून रोडरोमिओंवर प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पान १ वरून...

**जिल्हा बँक निवडणूक...**

लढत हिमायतनगर मतदारसंघात मानली जात आहे. माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर आणि माजी नगराध्यक्ष विशाल राठोड यांच्यातील सामना राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रभावक्षेत्रातील भोकर मतदारसंघातील लढतीकडेही राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

**बिनविरोधसाठी प्रयत्न, पण अपुरे**

खासदार अशोकराव चव्हाण, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न केले. विविध मतदारसंघांत समन्वय साधून तडजोडी घडवून आणण्याचा प्रयत्न झाला; मात्र काही इच्छुकांनी माघार घेण्यास नकार दिल्याने अखेर १२ जागांवर निवडणूक होणार आहे.

३० जुलै रोजी मतदान होणार असून, सहकार राजकारणातील या प्रतिष्ठेच्या निवडणुकीच्या निकालाकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# नरसीत डॉ. शंकरराव चव्हाण यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्याचे भाग्यविधाते, विकासाचे शिल्पकार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तसेच भारताचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे यांच्या नरसी येथील कार्यालयात दरवर्षीप्रमाणे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी नांदेड जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे, नायगाव तालुका शिवसेना प्रमुख रविंद्र पाटील भिलवंडे, बालाजीराव पाटील भिलवंडे, अनिल पाटील पवळे, हाजी शब्बीरशेठ बागवान, पत्रकार मारुती सूर्यवंशी, स. इरफान कुरेशी, अनिल बोधने, सुनील भेदे, पप्पू सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा दिली. सिंचन, शिक्षण, उद्योग, पायाभूत सुविधा, प्रशासनातील पारदर्शकता आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळाली.

डॉ. शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे दोन वेळा मुख्यमंत्री म्हणून राज्यकारभार यशस्वीपणे सांभाळला. त्यानंतर भारताचे गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री यांसारख्या महत्त्वाच्या केंद्रीय जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. शांत, संयमी, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्व ही त्यांची ओळख होती. प्रशासनावर मजबूत पकड, संविधानावरील निष्ठा आणि लोकहिताची भूमिका यामुळे ते देशाच्या राजकारणातील आदर्श नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

मराठवाड्याच्या शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून करण्यात आला.


# गौण खनिज विभागातील अपिलार्थीने मागितलेले सीसीटीव्ही फुटेज देण्यास हरकत नाही; राज्य माहिती आयुक्तांचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातून हदगाव तहसील कार्यालयात बदली झाल्यानंतर सतत आर्थिक लाभापोटी वाळू माफीयांशी चर्चा करत बसलेल्या एका कर्मचाऱ्यांची माहिती व संबंधित काळातील सीसीटीव्ही फुटेज अपिलार्थीने मागितल्यानंतर माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यास वाचविण्याच्या हेतूने माहिती देण्यास टाळाटाळ केली. उलट सदरची माहिती ही जनहित साध्य होत नसल्याने अर्ज निकाली काढला, परंतु तब्बल एका वर्षानंतर या प्रकरणात छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदुलकर यांनी सदरची माहिती ही जनहित साध्य होत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून देत माहिती अपिलार्थींना द्यावी अशी आदेश दिल्याने एकच खळबळ उडाली.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात गौण खनिज विभागातून हदगाव येथे बदली झाल्यानंतर वाळू माफियांशी आर्थिक हित जपण्यासाठी तहसील कार्यालयात कुठलाही रजेचा अर्ज न देता किंवा वरिष्ठांना माहिती न देता हा कर्मचारी नांदेडच्या गौण खनिज विभागात तासनतास बसत होता. त्या विभागाशी संबंधित कर्मचाऱ्यांचा कुठलाही संबंध नसताना तो कोणाच्या सांगण्यावरून या विभागात बसत गेला याबाबतची माहिती आणि त्यादरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावे अशी मागणी माहिती अधिकाराखाली अपीलार्थी शेख एजास यांनी मागितली होती. परंतु सदरची माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावली. विशेष म्हणजे त्यांनी मागितलेल्या माहितीचा अर्ज निकाली काढला.

सदरचे प्रकरण गंभीर असल्याचे अपिलार्थी शेख एजास यांनी छत्रपती संभाजीनगर येथील राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे दाद मागितली. आपल्या तक्रारीत सर्व माहिती आयुक्तांना दिली आणि तब्बल एक वर्षानंतर राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदुलकर यांनी मागितलेली माहिती ही जनहित साध्य होत असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास येत आहे असा शेरा मारत सदरची माहिती देण्यास काही हरकत नाही. माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दहा दिवसात सदरची माहिती द्यावी व तसा अहवाल आमच्या कार्यालयास कळवावा असेही आदेशात म्हटले आहे. यावरून नायब तहसीलदार आणि तहसीलदार (सर्वसाधारण) यांना चांगलीच चपराक बसली असून ५ जुलै २०२५ ते १५ जुलै २०२५ दरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज आता कुठल्याही परिस्थितीत द्यावे लागणार आहेत.

## डॉ. सान्वी जेठवाणी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्क व कल्याण मंडळाच्या सह-उपाध्यक्ष, विशेष कार्यकारी अधिकारी, भारतीय जनता पार्टी तृतीयपंथी आघाडीच्या महाराष्ट्र राज्य समन्वयक तसेच सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

अनेक वर्षांपासून तृतीयपंथी समाजाचे हक्क, शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्वावलंबन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक जतन आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या डॉ. जेठवाणी यांच्या कार्याची ही महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे. त्यांच्या या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस दिले.

CMYK

# अंतर्मन

## दुकानात हवी भरभराट?



### दुकान उघडताना, पहिल्या विक्रीवेळी, दिवे लावताना अन् दुकान बंद करताना या मंत्रांचा जप करा...

**प्रत्येक व्यापाऱ्याची इच्छा असते की त्याच्या दुकानात कायम ग्राहकांची वर्दळ राहावी, व्यवसायात वाढ व्हावी आणि आर्थिक भरभराट मिळावी. धार्मिक श्रद्धेनुसार, दुकान उघडण्यापासून ते बंद करण्यापर्यंत विशिष्ट वेळी काही मंत्रांचा श्रद्धेने जप केल्यास सकारात्मक ऊर्जा वाढते, नकारात्मक शक्तींपासून संरक्षण मिळते आणि माता लक्ष्मीची कृपा प्राप्त होते, अशी मान्यता आहे.**

» दुकान उघडताना म्हणायचा मंत्र : धार्मिक मान्यतेनुसार, दुकान उघडण्यापूर्वी ओम ह्रीं अर्हं णमो अक्खीण-महानसं झों झों नमः या मंत्राचा किमान ९ किंवा २१ वेळा जप करावा. त्यानंतर माता लक्ष्मीचे स्मरण करून 'ओम श्रीं ह्रीं क्लीं महालक्ष्म्यै नमः' या मंत्राचा जप करावा. अशी श्रद्धा आहे की, या मंत्रांच्या जपामुळे धनसंचयात वाढ होते. तिजोरी रिकामी राहत नाही आणि दुकानात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते.

» पहिली विक्री (बोहणी) झाल्यावर म्हणायचा मंत्र : दिवसातील पहिली विक्री झाल्यानंतर मिळालेली रक्कम कपाळाला लावून भगवान गणेशाचे स्मरण करावे आणि पुढील मंत्राचा १ किंवा ३ वेळा जप करावा. वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥ भगवान गणेश हे विघ्नहर्ता मानले जातात. या मंत्राच्या जपामुळे दिवसातील कामकाज निर्विघ्न पार पडते आणि व्यवसायात अडथळे येत नाहीत, अशी श्रद्धा आहे.

» व्यवसायवृद्धीसाठी मंत्र : व्यवसायात वारंवार अडथळे येत असतील किंवा प्रगती मंदावली असेल, तर पुढील मंत्राचा जप करणे शुभ मानले जाते. ओम ऐं ह्रीं श्रीं लक्ष्मी नारायणाय नमो नमः धार्मिक श्रद्धेनुसार, माता लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांचे एकत्र स्मरण केल्यास लक्ष्मीची कृपा स्थिर राहते. दुकानातील सकाळची पूजा पूर्ण झाल्यानंतर आपल्या आसनावर बसून या मंत्राचा ११ किंवा २१ वेळा जप करावा.

» सायंकाळी दिवे किंवा लाईट सुरू करताना म्हणायचा मंत्र : दुकानात सायंकाळी दिवा लावताना किंवा विद्युत दिवे सुरू करताना पुढील मंत्र म्हणावा. शुभं करोति कल्याणम् आरोग्यं धनसंपदा। शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोऽस्तुते॥ अशी मान्यता आहे की या मंत्रामुळे दुकानातील नकारात्मकता दूर होते, सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढते.

» दुकान बंद करताना म्हणायचा मंत्र : दुकान बंद करण्यापूर्वी पुढील मंत्राचा ७ वेळा जप करावा. ओम दक्षिण भैरवाय भूत-प्रेत बन्ध, तन्त्र-बन्ध, निग्रहनी, सर्व शत्रु संहारिणी कार्य सिद्ध कुरु कुरु स्वाहा। धार्मिक श्रद्धेनुसार, या मंत्रामुळे दुकानाभोवती संरक्षणाचे कवच निर्माण होते. तसेच नकारात्मक शक्ती, वाईट नजर आणि इतर अडथळ्यांपासून संरक्षण मिळते, अशी मान्यता आहे. शक्य असल्यास दुकानाचे शटर बंद करण्यापूर्वी मुख्य प्रवेशद्वाराजवळ मोहरीच्या तेलाचा छोटा चौमुखी दिवा लावणेही शुभ मानले जाते.

### महत्त्वाची सूचना...

मंत्र आणि त्यांच्याशी संबंधित लाभ हे धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि वास्तुशास्त्रीय मान्यतांवर आधारित आहेत. त्यांना वैज्ञानिक आधार असल्याचे सिद्ध झालेले नाही. व्यवसायातील यशासाठी प्रामाणिक परिश्रम, योग्य नियोजन, ग्राहकांशी विश्वासार्ह व्यवहार आणि आर्थिक शिस्त यांनाही तितकेच महत्त्व आहे.



# कोकिळा व्रत कधी सुरू होणार?

## जाणून घ्या तारीख, शुभ मुहूर्त, पूजाविधी अन् महत्त्व

**हिंदू धर्मात कोकिळा व्रताला विशेष धार्मिक महत्त्व आहे. अखंड सौभाग्य, सुखी वैवाहिक जीवन आणि उत्तम पतीप्राप्तीसाठी हे व्रत केले जाते. विवाहित महिला अखंड सौभाग्यासाठी, तर अविवाहित मुली भगवान शंकरांसारखा गुणी पती मिळावा या इच्छेने हे व्रत करतात. आषाढ शुक्ल पौर्णिमेपासून सुरू होणारे हे व्रत श्रावण पौर्णिमेला समाप्त होते. या काळात देवी पार्वतीच्या कोकिळा स्वरुपाची आणि भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली जाते.**



### कोकिळा व्रत कधी आहे?

» धर्मशास्त्रानुसार कोकिळा व्रताची सुरुवात आषाढ शुक्ल पौर्णिमेपासून होते आणि श्रावण पौर्णिमेपर्यंत हे व्रत पाळले जाते. पंचांगानुसार आषाढ शुक्ल पौर्णिमा तिथी २८ जुलै २०२६, मंगळवारी सायंकाळी ६.१९ वाजता सुरू होईल आणि २९ जुलै २०२६, बुधवारी रात्री ८.०६ वाजेपर्यंत राहील. उदया तिथीनुसार २९ जुलै २०२६ रोजी कोकिळा व्रताचा प्रारंभ होईल.

» श्रावण पौर्णिमा तिथी २७ ऑगस्ट २०२६, गुरुवारी सकाळी ९.०९ वाजता सुरू होऊन २८ ऑगस्ट २०२६, शुक्रवारी सकाळी ९.४९ वाजता समाप्त होईल. त्यामुळे उदया तिथीनुसार २८ ऑगस्ट २०२६ रोजी कोकिळा व्रताची सांगता होईल. याच दिवशी रक्षाबंधनाचाही सण साजरा केला जाणार आहे.



### कोकिळा व्रताची पूजाविधी

कोकिळा व्रताच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. त्यानंतर सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करावे. यानंतर व्रताचा संकल्प करून भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या मूर्ती किंवा प्रतिमेची स्थापना करावी. भगवान शिवांना दूध आणि गंगाजलाने अभिषेक करून बेलपत्र, धोतऱ्याची फुले किंवा फळे अर्पण करावीत. तसेच पांढरी व लाल फुले, भांग, धूप, दीप आणि अष्टगंध यांचा पूजेत समावेश करावा. शक्य असल्यास दिवसभर निराहार राहून व्रत करावे. तसे शक्य नसल्यास एक वेळ फळाहार करूनही हे व्रत करता येते. सायंकाळची पूजा विशेष महत्त्वाची मानली जाते. या वेळी विधीपूर्वक पूजा, आरती करून भगवान शिव आणि माता पार्वती यांना नैवेद्य अर्पण करावा. त्यानंतरच व्रतधारकाने फळाहार करावा. तसेच या दिवशी कोकिळा व्रताची कथा किंवा व्रतपाठ वाचल्यास विशेष पुण्यप्राप्ती होते, अशी श्रद्धा आहे.

### कोकिळा व्रताचे महत्त्व...

धार्मिक मान्यतेनुसार कोकिळा व्रत केल्याने महिलांना सुख, समृद्धी आणि अखंड सौभाग्य प्राप्त होते. अविवाहित मुलींना योग्य जीवनसाथी मिळण्यास मदत होते, तर विवाहित महिलांचे वैवाहिक जीवन अधिक सुखकर, प्रेमळ आणि दृढ बनते. विवाहात अडथळे येत असतील किंवा वैवाहिक जीवनात अडचणी निर्माण होत असतील, तर हे व्रत अत्यंत फलदायी मानले जाते. श्रद्धेनुसार माता सती यांनी भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी अनेक वर्षे कोकिळेचे रूप धारण करून कठोर तपश्चर्या केली होती. त्यानंतर त्यांचा पार्वती म्हणून पुनर्जन्म झाला आणि त्यांना भगवान शिव पतीरूपाने लाभले. त्यामुळे हे व्रत श्रद्धा, संयम आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानले जाते.

# फ्रिजवर ठेवू नये पाण्याची बाटली, या 5 वस्तूही घरात वाढवू शकतात नकारात्मक ऊर्जा!

**आजच्या काळात फ्रिज हा प्रत्येक घरातील अत्यावश्यक उपकरण बनला आहे. मात्र, वास्तुशास्त्रानुसार फ्रिज हा केवळ घरगुती उपकरण नसून घरातील ऊर्जा प्रवाहाशीही संबंधित मानला जातो. त्यामुळे फ्रिजवर कोणत्या वस्तू ठेवाव्यात आणि कोणत्या ठेवू नयेत, याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे वास्तुशास्त्रात सांगितले जाते.**

अनेक जण जागेअभावी फ्रिजवर औषधांची पेटी, जुनी बिले, पाण्याच्या बाटल्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा इतर साहित्य ठेवतात. परंतु वास्तुशास्त्रानुसार असे करणे टाळावे. अशी श्रद्धा आहे की, फ्रिजवर अयोग्य वस्तू ठेवल्याने घरातील सकारात्मक ऊर्जा कमी होऊ शकते आणि आर्थिक तसेच कौटुंबिक अडचणी निर्माण होऊ शकतात. वास्तुतज्ज्ञांच्या मते, फ्रिजवरील जागा शक्यतो स्वच्छ आणि रिकामी ठेवणे अधिक योग्य मानले जाते.



### फ्रिजवर या वस्तू ठेवणे टाळा

» औषधे : फ्रिजवर औषधे ठेवणे वास्तुशास्त्रानुसार शुभ मानले जात नाही. अशी श्रद्धा आहे की यामुळे घरातील सदस्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि वैद्यकीय खर्च वाढण्याची शक्यता असते.

» जुनी बिले, कागदपत्रे किंवा कचरा : जुनी बिले, फाटलेल्या वह्या, निरुपयोगी कागद किंवा कोणत्याही प्रकारचा कचरा फ्रिजवर ठेवू नये. वास्तुशास्त्रानुसार यामुळे नकारात्मक ऊर्जा वाढू शकते आणि घरात वाद-विवाद किंवा तणाव निर्माण होऊ शकतो.

» पाण्याच्या बाटल्या किंवा इतर द्रवपदार्थ : फ्रिजच्या वर पाण्याच्या बाटल्या किंवा इतर द्रवपदार्थ ठेवणे टाळावे, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. यामागे अग्नी आणि जल या तत्त्वांमध्ये असंतुलन निर्माण होण्याची संकल्पना मांडली जाते. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद वाढू शकतात, अशी मान्यता आहे.

» जड इलेक्ट्रॉनिक उपकरणे : फ्रिजवर मायक्रोवेव्ह, एअर फ्रायर किंवा इतर जड इलेक्ट्रॉनिक उपकरणे ठेवणेही योग्य मानले जात नाही. वास्तुशास्त्रानुसार यामुळे घरातील प्रमुख व्यक्तीवर मानसिक ताण वाढू शकतो आणि आर्थिक स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो, अशी श्रद्धा आहे.

» कृत्रिम फुले किंवा सजावटीची रोपे : फ्रिजवर कृत्रिम फुले किंवा प्लास्टिकची सजावटीची रोपे ठेवणेही शुभ मानले जात नाही. अशा वस्तूंमुळे नातेसंबंधांमध्ये दुरावा वाढू शकतो आणि घरातील सौहार्द कमी होऊ शकते, अशी वास्तुश्रद्धा आहे.

### लक्षात ठेवा...

वास्तुशास्त्रातील हे नियम धार्मिक आणि पारंपरिक श्रद्धांवर आधारित आहेत. त्यांना वैज्ञानिक आधार असल्याचे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे या गोष्टींकडे श्रद्धा आणि वैयक्तिक विश्वासाच्या दृष्टीने पाहावे. मात्र, फ्रिजवरील जागा स्वच्छ, नीटनेटकी आणि अनावश्यक वस्तूंविना ठेवणे हे स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने निश्चितच फायदेशीर ठरू शकते.

# मंदिरात प्रदक्षिणा किती वेळा घालावी? जाणून घ्या प्रदक्षिणेचे नियम

**हिंदू धर्मात मंदिरात जाऊन देवदर्शन घेतल्यानंतर प्रदक्षिणा घालण्याची परंपरा आहे. मात्र, प्रदक्षिणा कोणत्या दिशेने घालावी, कोणत्या देवतेला किती प्रदक्षिणा घालाव्यात आणि त्यामागील धार्मिक नियम काय आहेत, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. चला, प्रदक्षिणेचे महत्त्व, योग्य पद्धत आणि आवश्यक नियम जाणून घेऊया...**

धार्मिक मान्यतेनुसार, प्रदक्षिणा म्हणजे देवाला केंद्रस्थानी मानून श्रद्धा आणि भक्तिभावाने त्यांच्या भोवती प्रदक्षिणा घालणे. यामुळे भक्ताची ईश्वराप्रती असलेली निष्ठा, समर्पण आणि श्रद्धा व्यक्त होते. स्कंदपुराणातही प्रदक्षिणेचे विशेष महत्त्व सांगितले आहे. श्रद्धेने आणि योग्य पद्धतीने प्रदक्षिणा घातल्यास आध्यात्मिक लाभ मिळतो, अशी मान्यता आहे.

### कोणत्या देवतेला किती प्रदक्षिणा घालाव्यात?

» भगवान गणेश : ३ किंवा ५ प्रदक्षिणा.

» भगवान विष्णू : ४ प्रदक्षिणा शुभ मानल्या जातात.

» देवी दुर्गा : १ किंवा ९ प्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे.

» सूर्यदेव : शक्य असल्यास ७ प्रदक्षिणा घालाव्यात.

» शिवलिंग : शिवलिंगाची पूर्ण प्रदक्षिणा घालत नाहीत. अर्धी किंवा मंदिराच्या परंपरेनुसार निर्धारित प्रदक्षिणा घालावी.

### प्रदक्षिणा घालताना या गोष्टी लक्षात ठेवा

» प्रदक्षिणा कधीही धावत किंवा घाईघाईने घालू नये. शांत आणि सामान्य गतीने चालावे.

» प्रदक्षिणेदरम्यान हसणे, गप्पा मारणे किंवा मोबाईलवर बोलणे टाळावे.

» इतर भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी आणि मंदिरातील नियमांचे पालन करावे.

» आरोग्याच्या कारणामुळे किंवा जागेच्या मर्यादेमुळे प्रदक्षिणा घालणे शक्य नसेल, तर श्रद्धेने देवाचे स्मरण करून प्रार्थना करावी. भक्तीभाव सर्वांत महत्त्वाचा मानला जातो.



### प्रदक्षिणा कोणत्या दिशेने घालावी?

प्रदक्षिणा नेहमी दक्षिणावर्त, म्हणजेच घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने घालावी. ही दिशा शुभ मानली जाते. प्रदक्षिणेची सुरुवात आणि समाप्तीही याच दिशेने करावी. प्रदक्षिणेदरम्यान मन पूर्णपणे देवाच्या स्मरणात असावे. संबंधित देवतेचा नामजप करावा. मन शांत आणि एकाग्र ठेवावे. श्रद्धा, भक्ती आणि सकारात्मक भावनेने प्रदक्षिणा घातल्यास तिचे पूर्ण धार्मिक फल प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. प्रदक्षिणा ही केवळ धार्मिक कृती नसून ईश्वराला आपल्या जीवनाचे केंद्र मानण्याची भावना व्यक्त करणारी आध्यात्मिक साधना आहे. श्रद्धा, नम्रता आणि एकाग्रतेने केलेली प्रदक्षिणा मनाला शांती देण्यासोबतच आध्यात्मिक उन्नतीसाठीही उपयुक्त मानली जाते.

# आता शाळेत मिळणार 'ड्रग्ज'च्या दुष्परिणामांचे धडे

## मख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र व्यूहरचना आणि कृती योजनेबाबत बैठक



**मुंबई (प्रतिनिधी)** – शालेय जीवनापासूनच अंमली पदार्थांच्या घातक दुष्परिणामाविषयी विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जागृती आणण्यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये अंमली पदार्थ दुष्परिणाम विषयक घटकांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिले. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित 'अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र व्यूहरचना आणि कृती योजना' बैठकीत ते बोलत होते. सशक्त महाराष्ट्रासाठी व्यसनमुक्तीच्या या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे सांगत, नैसर्गिक व कृत्रिमरित्या तयार होणाऱ्या अंमली पदार्थांचे उत्पादन, पुरवठा आणि खरेदी-विक्रीच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला मुळापासून उखडून टाकण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.

या उच्चस्तरीय बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते आणि मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती उपस्थित होते. नशेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची इच्छा असलेल्या नागरिकांसाठी राज्यामध्ये नशामुक्ती केंद्रांची एक मजबूत साखळी उभारण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने तसेच वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या समन्वयातून ही केंद्रे उभारली जातील. मुंबईत महापालिकेने स्वतंत्र बहुशाखीय नशामुक्ती केंद्र सुरू करावे, तसेच राज्यातील सर्व मोठी व शासकीय रुग्णालयांमध्ये काही खाटा या केंद्रांसाठी राखीव ठेवाव्यात, जेणेकरून नशामुक्त झालेली व्यक्ती पुन्हा या गर्तेत जाणार नाही. तसेच शाळा आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व मुख्याध्यापकांनी पुढाकार घेऊन आपले शैक्षणिक परिसर अंमली पदार्थमुक्त घोषित करण्यासाठी कडक नियमावली तयार करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस सारख्या कडक कायद्यांचा प्रभावी वापर करून खटले वेगाने निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन केली जातील.

या प्रकरणांमध्ये आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी सरकारी वकिलांचे विशेष प्रशिक्षण घेतले जाईल. अंमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांचा शोध घेऊन त्यांची संपूर्ण पुरवठा साखळी उद्ध्वस्त करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना दिले. तसेच, या क्षेत्रात गोपनीय माहिती देणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी बक्षीस योजना सुरू केली जाईल. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या तीन टक्के आगाऊ वेतन, तपास कार्यासाठी आवश्यकतेनुसार विमान प्रवासाची सवलत आणि विशेष पुरस्कार दिले जातील.

### पाच वर्षांत हजारो कोटींचे अंमली पदार्थ जप्त

बैठकीत अंमली पदार्थ विरोधी कृती दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग यांनी सविस्तर सादरीकरण केले. त्यानुसार, २०२१ ते २०२५ या कालावधीत पोलिसांनी केलेल्या कारवायांमध्ये ६ हजार ५५० कोटी रुपयांचे ५.७ टन मेफेड्रोन जप्त केले आहे. याशिवाय ४८४.७५ कोटींचे हेरॉईन (१३४ किलो), १८६.४४ कोटींचा गांजा (१०९.७ टन), १४.६७ कोटींचे चरस (७५९ किलो) आणि १४.६० कोटींचे कोकेन (१३४ किलो) जप्त करण्यात आले आहे. केवळ २०२५ या एका वर्षात १७ हजार ६११ प्रकरणांमध्ये १ हजार ३४० कोटी रुपये किमतीचे एकूण ५६ हजार २०६ किलो विविध अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, या प्रकरणी १५ हजार ९९४ आरोपींना अटक करण्यात आली आहे, ज्यामध्ये ७२ परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

ई-२० पेट्रोल वादात देशातील ऐतिहासिक निकाल

# कंपनीला द्यावी लागणार नवी कार किंवा २० लाख रुपये




**रायपूर (वृत्तसंस्था)** – देशभरात सध्या इथेनॉल मिश्रित असलेल्या ई-२० इंधनावरून जोरदार चर्चा सुरु आहे. या ई-२० वरून विविध मते व्यक्त केली जात असून लोकांच्या मनात अनेक शंका आहेत. या चर्चाच्या दरम्यान, छत्तीसगडमधील रायपूर जिल्हा ग्राहक न्यायालयाने (अतिरिक्त पीठ) एका नामांकित कार कंपनी आणि स्थानिक डीलरला जोरदार चपराक लगावली आहे. ई-२० पेट्रोल आणि कारच्या इंजिनमधील ई-२० पेट्रोल कटात देशातील ऐतिहासिक निकान, कंपनीला द्यावी बिघाडाबाबत आलेला हा देशातील अशा प्रकारचा पहिलाच ऐतिहासिक निकाल आहे.

ग्राहकाची फसवणूक आणि खराब सेवेप्रकरणी कोर्टाने कंपनी व डीलर या दोघांनाही दोषी धरले आहे. ग्राहक मंचाचे अध्यक्ष प्रशांत कुंडू आणि सदस्य डॉ. आनंद वर्गीस यांच्या खंडपीठाने पीडित डॉक्टर ग्राहकाला त्याच मॉडेलची नवीन ए२० पेट्रोल सपोर्ट करणारी कार देण्याचे आदेश दिले आहेत.

ग्राहक न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, जर कंपनी आणि डीलरने पुढील ४५ दिवसांच्या आत ग्राहकाला नवीन कार दिली नाही, तर त्यांना गाडीची मूळ किंमत, आरटीओ आणि विम्याचा खर्च मिळून एकूण २० लाख ५० हजार ४९४ रुपये ग्राहकाला परत करावे लागतील. इतकेच नाही तर, या रकमेवर आदेशाच्या तारखेपासून ते प्रत्यक्ष पैसे मिळेपर्यंत ७ टक्के दराने वार्षिक व्याजही द्यावे लागेल. यासोबतच ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाबद्दल १ लाख रुपयांची भरपाई आणि न्यायालयीन खर्चासाठी १०,००० रुपये वेगळे देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# जगन्नाथपुरी रथयात्रेत चेंगराचेंगरी; दोन भाविकांचा मृत्यू, १०० जखमी

**भुवनेश्वर (वृत्तसंस्था)** – रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिती उद्भवल्याने दोन भाविकांचा मृत्यू झाला. गुरुवारी घडलेल्या या घटनेत सुमारे १०० पेक्षा जास्त भाविकांची श्वास घेण्यास त्रास सुरू झाल्याने प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

पुरीमध्ये घटना बडा दंडा अर्थात ग्रॅंड रोड येथे ही घडली. या ठिकाणी भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांचे रथ ओढताना पाहण्यासाठी भाविकांचा जनसागर लोटला होता.

प्राथमिक माहितीनुसार, गर्दी वाढत गेली आणि चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. लोकांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. काही जण चक्कर येऊन जागेवर कोसळले. यात गुदमरून प्रकृती बिघडल्याने भाविकांना तातडीने प्रथमोपचार देण्यात आले. त्यानंतर त्यांना तातडीने पुरी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान दोन भाविकाचा मृत्यू झाला.

गर्दीमुळे प्रचंड कोंडी झाली होती. त्यामुळे असंख्य भाविकांना चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थितीचा फटका बसला. १०० पेक्षा जास्त भाविकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सुरुवातीच्या वृत्तानुसार सुमारे १०० पेक्षा जास्त लोकांची प्रकृती बिघडली असून, अधिकाऱ्यांनी अद्याप अंतिम आकडा जाहीर केलेला नाही.

# पुनरिक्षण मोहिमेत कार्यकर्त्यांनी पुढे यावे -ना. राधाकृष्ण विखे पाटील




**मुंबई (प्रतिनिधी)** – मतदार यादीची सखोल पुनरिक्षण मोहीम भविष्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. सरकारी स्तरावर काम सुरू असले तरी संघटनात्मक पातळीवर कार्यकर्ते आणि बुथप्रमुखांनी यामध्ये यौगदान देण्याचे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पाथर्डी शेवगाव विधानसभा मतदार संघातील मतदार यादी सखोल पुनरिक्षण मोहीमेचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी जाणून घेतला. आ.मोनिका राजळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, विनायक देशमुख यांच्यासह या मोहीमेसाठी नियुक्त करण्यात आलेले पक्षाचे प्रतिनिधी कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थितप्रतिनिधींनीविचारलेल्या प्रश्नांचे निरसन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी केले. आतापर्यत मतदार संघात १ लाख ७१ हजार अर्जाचे वितरण झाले आहे. आता अर्ज भरून घेण्याच्या कामाला गती द्यावी लागेल. सरकारी यंत्रणेच्या एक पाउल पुढे जावून संघटनात्मक स्तरावर अधिक काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. संपूर्ण देशातील २२ राज्यात ही मोहीम सुरू असल्याचे नमूद करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,या मोहीमेमुळे कोणत्याही मतदारावर अन्याय होणार नाही. दुबार मतदार आणि मतदार यादीत खोटी माहीती देवून नाव टाकलेल्या व्यक्तीची नाव कमी करण्याची संधी आहे. पश्चिम बंगालमध्ये मोहीम राबविल्यामुळे मतदार यादीतील घुसखोर उघडे पडले. निवडणूक प्रक्रीयेत गुंडगिरी दहशत करून अराजक निर्माण करण्याचे काम वर्षानुवर्ष सुरू होते.

# अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेत रघुराम राजन यांना मिळाली महत्वाची जबाबदारी



**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)** – अमेरिकी फेडरल रिझर्वने मौद्रिक धोरण समीक्षेसाठी पाच प्रमुख टास्क फोर्सची स्थापना केली आहे. यात भारतीय वंशाच्या तीन एक्सपर्ट्र्सचा समावेश केला आहे. भारतीय रिझर्व बँकेचे माजी गर्वनर रघुराम राजन, हार्वर्ड विश्वविद्यालयाच्या अर्थशास्त्रज्ञ राज चेट्टी आणि मायक्रोसॉफ्टच्या कार्यकारी अधिकारी आशा शर्मा यांचा टास्क फोर्समध्ये समावेश केला आहे. फेडरल रिझर्वचे नवीन चेअरमन केविन वार्श यांनी मॉनिटरी पॉलिसी बनवण्याच्या महत्वपूर्ण क्षेत्रासाठी ही टास्क फोर्स बनवली आहे. यात कम्युनिकेशन, बॅलन्स शीट पॉलिसी, डेटा, प्रोडक्टविटी अँड जॉब, इन्फ्लेशन फ्रेमवर्क अशा विषयांचा समावेश आहे.

रघुराम राजन हे बॅलन्स शीट निती टास्क फोर्समध्ये आहेत. या पॅनलमध्ये हार्वर्डचे अर्थशास्त्री करेन डायनन आणि फेडर रिझर्वचे माजी गर्वनर जेरेमी स्टीन यांचा समावेश आहे. ही टास्क फोर्स फेडरल रिझर्वची वर्तमान बॅलन्स शीट व्यवस्था खर्च, लाभ याचा तपास करेल. राजन यात एक्सपर्ट म्हणून मदत करतील. त्यांच्या अनुभवाचा फायदा होईल. जागतिक अर्थव्यवस्था आणि मॉनिटीरी पॉलिसीचे ते तज्ज्ञ मानले जातात.

# पंतप्रधान आज ७५ रेल्वे स्थानके राष्ट्राला समर्पित करणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – रेल्वे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात आणि स्थानकांचे रूप पालटावे, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'अमृत भारत स्टेशन योजने'चा पुढील टप्पा उद्या, १७ जुलै २०२६ रोजी पूर्ण होत आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे देशातील नूतनीकरण केलेल्या ७५ रेल्वे स्थानकांचे लोकार्पण करणार आहेत. यात मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील जुन्नारदेव स्थानकाचाही समावेश आहे.

मध्य प्रदेशातील जुन्नारदेव रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी २५.४० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. हे स्थानक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, तामिया हिल्स, पातालकोट व्हॅली आणि करंजी धबधबा यांसारख्या पर्यटन स्थळांना जोडणारे हे एक प्रमुख प्रवेशद्वार आहे. आधुनिक स्थानक इमारत, वातानुकूलित प्रतीक्षा कक्ष, दिव्यांग-स्नेही सुविधा आणि विस्तारित शेड यामुळे या स्थानकाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. दररोज सुमारे २,८६७ प्रवाशांना या आधुनिक सुविधांचा लाभ मिळणार आहे.

देशातील एकूण १३३७ स्थानकांच्या पुनर्विकासाचे लक्ष्य 'अमृत भारत स्टेशन योजने'द्वारे ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रातही या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, राज्यातील १३२ स्थानके या योजनेत निवडली गेली आहेत. यापैकी आतापर्यंत १५ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून, ती राष्ट्राला समर्पित करण्यात आली आहेत.

# एमपीएससीच्या ऑनलाईन परीक्षा यंदा नाही, पुढील वर्षापासून अंमलबजावणी होणार- मुख्यमंत्री




**मुंबई (प्रतिनिधी)** – सातत्याने विविध विद्यार्थी संघटनांकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार तसेच राज्याचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत एक बैठक मुंबई येथे घेतली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एक सुरक्षित, पारदर्शी निवड प्रक्रिया हा कायमच माझा आग्रह राहिला आहे. त्यादृष्टीने परीक्षापद्धती सुद्धा पारदर्शीच असली पाहिजे. परीक्षा वेळेत झाल्या पाहिजे आणि त्याचे निकाल सुद्धा वेळेत लागले पाहिजेत. पण, सुधारणांचा हा क्रम हाती घेताना एका व्यवस्थेकडून दुसऱ्या व्यवस्थेकडे मार्गोत्क्रमण हे तितकेच सुरळीत सुद्धा असले पाहिजे. त्यातून प्रत्येक यंत्रणेला सज्जतेसाठी पुरेसा अवधी सुद्धा मिळावा. त्यामुळे टप्प्या-टप्प्याने या सुधारणा राबवत संगणकआधारित परीक्षांची प्रक्रिया ही लगेच लागू न करता ऑगस्ट २०२७ पासून अंमलात आणावी, जेणेकरुन विद्यार्थ्यांनाही वेळ मिळेल आणि सर्वच यंत्रणांना सज्जता वाढवता येईल आणि तोवर विद्यमान प्रचलित पद्धतीने परीक्षा घ्याव्यात. त्यानुषंगाने आता पुढील निर्णय एमपीएससीने घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले. एमपीएससीच्या विविध उपक्रमांची त्यांनी यावेळी प्रशंसाही केली.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड**

**ई-निविदा सूचना क्रमांक (०७) सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२५३७११) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ३५ कामांकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप-
१) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड



**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री चांदु रामा कांबळे रा. मुजळगा ता. देगलूर जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या मुलाचा जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करिता मागणी केली आहे.

जन्म झाल्याचे नाव श्री तुशाल चांदू कांबळे

सदर व्यक्तीचा मुजळगा या ठिकाणी दिनांक २८-०३-२००८ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करिता आदेश होण्याकरिता दिनांक २५-०७-२०२५ रोजी तहसील कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक स्थळ व व्यक्ती बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार देगलूर



**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन द्वारे सूचित करण्यात येते की , माझे पक्षकार दिपाली गजानन चाडावार व लता श्रीकांत कंचर्लावार दोघे रा.किनवट ता. किनवट जि. नांदेड यांनी पंढरीनाथ पुंडलिक पाणधोंडे रा. प्रधानसांगवी ता. किनवट जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील शेत गट क्र. १२१/१ क्षेत्र ०२ हे.०० आर पैकी ० हे. ८० आर ज्याची चतु;र्सिमा पूर्वेस :- बिराजदार यांचे शेत जमीन , पश्चिमेस :- रामदास पुंडलिक पाणधोंडे यांची शेत जमीन , उत्तरेस:- संगीता संतोष राठोड यांची शेत जमीन , आणि दक्षिणेस :- दिपाली गजानन चाडावार व लता श्रीकांत कंचर्लावार यांची शेत जमीन मौजे चिखली ( बु.) ता. किनवट जि. नांदेड येथील मिळकत खरेदी करण्याचा सौदा केला असून काही रक्कम बयाना म्हणून दिली व त्या प्रमाणे सौदा पत्र लिहिण्यात आले असून माझे पक्षकार हे लवकरच उपरोक्त मालमत्तेची रितसर खरेदी खत करून घेण्यास तयार आहे.

त्यामुळे सदर वर्णनाच्या मालमत्ते बाबत कुणाचेही काही हितसंबंध ,गहान, बोजा किंवा वारसा हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत तसे लेखी कळवावे मुदती नंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व मुदतीनंतर माझे पक्षकार लवकरच खरेदी खत करून घेतील .

सबब जाहीर प्रगटन

दिनांक :- १५ /०७/२०२६
मार्फत
अँड. दिलीप काळे
किनवट

जाहीर प्रगटन देणार
१] दिपाली गजानन चाडावार
२] लता श्रीकांत कंचर्लावार



(जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा कांडली )

**विषय - मौ. कांडली येथील गट क्र. 245 मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ सा.कु. पिराजी भोजन्ना 59-60 (10128) अशी ही नोंद कमी करणे बाबत.**

**संदर्भ - अर्जदार श्री गणेश तुकाराम राठोड रा. कांडली ता. भोकर जि. नांदेड यांचा अर्ज दिनांक 13/07/2026.**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रकाचे अनुषंगाने अर्जदार श्री गणेश तुकाराम राठोड रा. कांडली ता. भोकर जि. नांदेड यांनी मौ. कांडली येथील गट क्र. 245 मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ सा.कु. पिराजी भोजन्ना 59-60 (10128) अशी ही नोंद अशी ही नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी सादर केलेल्या 7/12 चे अवलोकन केले असता इतर अधिकारात मौ. कांडली येथील गट क्र. 245 मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ सा.कु. पिराजी भोजन्ना 59-60 (10128) अशी कुळाचे नोंद दिसुन येते.

करीता याव्दारे मौ. कांडली येथील गट क्र. 245 मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ सा.कु. पिराजी भोजन्ना 59-60 (10128) कुळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा इतर कोणी हितसंबंधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास अथवा हरकत असल्यास त्यांनी आपले आक्षेप 15 दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात नियमानुसार व गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ - भोकर
दिनांक 13/07/2026.

(विनोद गुंडमवार)
तहसिलदार,भोकर



**:: जाहिर प्रगटन ::** दि. 16/07/2026

आमचे पक्षकार **अशोक पि.बाबाराव सोनकांबळे, रा.सिध्दार्थ नगर, लोहा ता.लोहा जि. नांदेड** यांनी सौदाचिठ्ठीच्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री पंडीत ग्यानोबा गजभारे, वय 50 वर्षे, धंदा मजुरी, रा.गोपाळचावडी ता.जि. नांदेड यांनी दि.16/07/2026 रोजी सौदाचिठ्ठी आधारे सौदाचिठ्ठी करुन आमच्या पक्षकाराचा हक्कात करुन बॉन्ड क्र.58 ए बी 405971 नुसार मौजे गोपाळचावडी ता.जि. नांदेड ग्रामपंचायत हद्दीतील शेत गट क्र.41 पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट क्र.149 ज्याची लांबी पुर्व-पश्चिम 40 फुट आहे व रुंदी उत्तर-दक्षिण 30 फुट आहे. सदरील प्लॉटचे एकुण क्षेत्र 1200 चौ.फुट आहे. ज्याची चुर्त:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- 15 फुटाचा रुंद रोड आहे.
पश्चिमेस :- प्लॉट क्र.148 आहे.
दक्षिणेस :- 15 फुट रुंद रोड आहे.
उत्तरेस :- प्लॉट क्र.163 आहे.

येणे प्रमाणे चुर्त:सिमेच्या आतील प्लॉट माझ्या पक्षकारांनी खरेदी करण्याचा सौदा केला असुन बयाना रक्कम देऊन सौदाचिठ्ठी करुन घेतली आहे.उर्वरीत रक्कम देऊन खरेदीखत करण्याचे ठरले आहे.

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस अथवा संबंधीतास सूचीत करण्यात येते की, सदर माझे पक्षकाराचे व्यवहारा बाबत कोणाचा काही आक्षेप, उजर, तक्रार, हित संबंध असल्यास तसा लेखी आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह खालील दिलेल्या पत्त्यावर हे प्रगटन प्रसिध्द झाल्या तारखेपासुन 15 (सात) दिवसाचा आत नोंद वावा. अन्यथा विहीत मुदतीनंतर माझे पक्षकार विक्रीखत करुन घेतील. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन

मार्फत :-
अ‍ॅड सुमंत दि.लाठकर
नांदेड
मो.9370133668

लिहुन देणार
अशोक पि.बाबाराव सोनकांबळे,
रा.सिध्दार्थ नगर, लोहा ता.लोहा जि. नांदेड
Mo. 70306035/6



**Change In Name**

My Old Name is **SANA FATIMA ABDUL HABEEB** which now I am changing as New Name **SANA FATEMA SHAIKH RAFEEQ .** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** H.No. 9-7-1187/2, Mohammadiya Colony, Degloor Naka, Itwara Nanded 431604
Mo.No. 9860809801



**Change In Name**

My Old Name is **MUKARRAM AHMAD** which now I am changing as New Name **MUKARRAM AHMAD AEIJAZ AHMAD .** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** Plot No. 55, Galli No. 182, Asra Nagar, Nanded 431605 Maharashtra



**Change In Name**

My Old Name is **MOHAMMAD TABISH AFTAB ZAMEERUDDIN** which now I am changing as New Name **MOHD TABISH AFTAB ZAMEERUDDIN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address -
**Ali Nagar, Mafco Road, Nanded 431604**
**Mo.No. 9518338433**



**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नांदेडच्या ज्वेलर्स चालकाची ७४ लाख, २४ हजारांची फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगलूर नाका परिसरातील अस्सार कॉलनी येथील रोज ज्वेलर्समध्ये तब्बल ७४ लाख, २४ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच एमपीआयडी कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडून पुढील तपास सुरू आहे.

सन २०२३ ते २०२६ या कालावधीत आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व इतर साक्षीदारांकडून सोने तसेच ऑनलाईन पद्धतीने रक्कम स्वीकारली. या गुंतवणुकीवर




अधिक मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवत बनावट बँक आदेश आणि बनावट बाँड पेपर तयार करून त्यावर शिक्के मारून विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर एकूण ७४ लाख २४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी मोहम्मद फैजल मोहम्मद एजाज (वय ३०, रा. अस्सार कॉलनी, देगलूर नाका, नांदेड) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आलिया जिशान अन्वर शेख, जिशान अन्वर शेख, शेख आवेश अख्तर आणि शेख जेद शेख आवेश अख्तर यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## अवैध व्यवसायांविरोधातील मोहिमेत १५ दिवसांत १०.१८ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्राचे पोलीस उप-महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ३१ जुलै दरम्यान अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ आणि घातक शस्त्रांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पहिल्या पंधरवड्यात म्हणजे दि. १ ते १५ जुलैदरम्यान नांदेड परिक्षेत्रात मोठी कारवाई करण्यात आली.

या कालावधीत एकूण ८५३ गुन्हे दाखल करून १११४ इसमांविरुद्ध कारवाई करण्यात आली. कारवाईत आरोपींकडून १० कोटी १८ लाख ६४ हजार ९६७ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुटखा प्रकरणे– भारतीय न्याय संहिता कलम १२३ अंतर्गत – २७ गुन्हे, मटका–जुगार – महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत – १३२ गुन्हे, दारू – महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत –५७५ गुन्हे, शस्त्र अधिनियम – २४ गुन्हे आणि इतर अधिनियम – ९५ गुन्हे दाखल करण्यात आले.

जिल्हानिहाय मुद्देमाल जप्ती – नांदेड– ६,५७,२८,५५१, लातूर– २,८४,८४,३७१, परभणी– ४५,०४,८५८, हिंगोली– ३१,४७,१८७ एकूण– १०,१८,६४,९६७. परिक्षेत्रात सुरू असलेली ही अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम पुढील पंधरवड्यात आणखी व्यापकपणे राबविण्यात येणार आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सांगितले.

## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा हिंगोलीमधील तक्रारदारांशी 'संवाद'

**नांदेड (प्रतिनिधी) –** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस, नागरिक यांच्यातील संवाद वाढवून लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.



परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. या दरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उपमहानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. दि. १६ जुलै रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक, हिंगोली कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतला. नंतर दुपारी २.३० ते ४ या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. या दरम्यान, एकूण ७ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात मालमत्ताविषयक वाद, अवैध व्यवसाय, दाखल गुन्ह्यांचा तपास इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली ग्रामीण व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.

## लक्ष्मीबाई खेळगे यांचे निधन

**कुंडलवाडी (प्रतिनिधी) –** कुंडलवाडी येथील लक्ष्मीबाई ईरण्णा पाटील खेळगे (१०२) यांचे गुरुवार, दि. १६ जुलै २६ रोजी ११.३० वा. निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता कुंडलवाडी येथील कार्ला रोडवरील स्वतःच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै. लक्ष्मीबाई यांच्या पश्चात त्यांची मुले सेवानिवृत्त मंडळ अधिकारी गंगाधर पाटील खेळगे, सेवानिवृत्त प्राध्यापक नागनाथ पाटील खेळगे, मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## 'छत्रपती शिवाजी महाराज : विचारधारा आणि व्यवस्थापन' विषयावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज : विचारधारा आणि व्यवस्थापन हा एम. ए. पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात यावा, अशी मागणी विद्यापीठ प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, राष्ट्रनीती, लोककल्याणकारी प्रशासन, नेतृत्त्वगुण आणि व्यवस्थापन तत्त्वांचा शैक्षणिक स्वरूपात विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यास पोहोचावा, या उद्देशाने हा अभ्यासक्रम सुरू करण्याची विनंती करण्यात आली आहे. लक्ष्यवेध फाऊंडेशनचे अध्यक्ष एकनाथ मोरे आणि उपाध्यक्ष निवृत्त शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी तसे निवेदन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,



छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही प्रशासन, न्यायव्यवस्था, राष्ट्रनिष्ठा, लोककल्याण आणि दूरदृष्टी यासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या कार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य, निर्णयक्षमता, शिस्त, नैतिक मूल्ये, संघटन कौशल्य, संकट व्यवस्थापन आणि राष्ट्रप्रेम विकसित करण्यास उपयुक्त ठरेल. तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतीय ज्ञानपरंपरा, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि भारतीय इतिहासाला विशेष महत्त्व देण्यात आले असून, प्रस्तावित अभ्यासक्रम त्या उद्दिष्टांना पुरक ठरणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आजच्या काळात युवकांना व्यसनमुक्त, चारित्र्यसंपन्न, कर्तव्यदक्ष, समाजाभिमुख आणि सक्षम नेतृत्त्व म्हणून घडविण्यासाठी शिवचरित्राचा शैक्षणिक अभ्यास आवश्यक असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात हा अभ्यासक्रम यशस्वीपणे सुरू असून विद्यार्थ्यांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याच धर्तीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातही हा अभ्यासक्रम सुरू केल्यास मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## वाहतूक विशेष मोहिमेंतर्गत ३३६ गुन्हे, ४.१५ लाखांचा दंड वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाढलेले अतिक्रमण आणि अवैध वाहन पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नांदेड शहर वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली ही अतिक्रमण निर्मूलन व वाहतूक नियमन मोहीम राबविण्यात आली.

दि. १५ जुलै रोजी वजिराबाद शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या नेतृत्त्वाखाली कलामंदिर, सोमेश कॉलनी, मिलरोड, डॉक्टर लेन ते रेल्वे स्टेशन या प्रमुख मार्गांवर संयुक्त कारवाई करण्यात आली. या मोहिमेत शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार, RCP पथक तसेच महानगरपालिकेचे पथक सहभागी झाले होते. कारवाईदरम्यान रस्त्यालगतची अतिक्रमणे हटवण्यात आली. हातगाड्या, फळविक्रेते, टपऱ्या आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे इतर अडथळे दूर करण्यात आले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून एकूण ४ लाख १५ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला. चुकीचे वाहन पार्किंग व रहदारीस अडथळा – ९५ केसेस – दंड ८२,५००, ट्रिपल सीट – ४८ केसेस – दंड ४८,०००, इतर मोटार वाहन अधिनियमांतर्गत– १९३ केसेस – दंड २,८५,००० असा एकूण ३३६ केसेस– दंड ४,१५,५०० रुपये वसूल करण्यात आला.

## 'एसआयआर'साठी मुदतवाढ मिळाल्याचा संदेश चुकीचा

**नांदेड (प्रतिनिधी) –**महाराष्ट्र राज्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी मुदतवाढ मिळाल्याचा चुकीचा संदेश समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यासाठी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास अद्याप कोणतीही मुदतवाढ देण्यात आली नाही.

त्यामुळे सर्व पात्र मतदारांनी २९ जुलै २०२६ पर्यंत संबंधित बुथ लेव्हल अधिकारी यांच्याकडे गणना पत्रक भरून जमा करावे व निवडणूक विभागास सहकार्य करावे, याची सर्व पात्र मतदार, बुथ लेव्हल एजंट, लोकप्रतिनिधी तसेच निवडणूक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी. तसेच एसआयआर कार्यक्रमाबाबत कोणतीही अप्रमाणित अथवा चुकीची माहिती, दिशाभूल करणारे संदेश, वृत्त किंवा बातम्या समाजमाध्यमांवर प्रसारित अथवा शेअर करू नयेत. अधिकृत माहितीलाच प्राधान्य देऊन अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## सरसेनापती नेताजी पालकर स्मारकासाठी 'छावा'चे बेमुदत उपोषण सुरू

**नांदेड (प्रतिनिधी) –**छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरसेनापती आणि इतिहासात 'प्रतिशिवाजी' म्हणून ओळखले जाणारे नेताजी पालकर यांच्या तामसा (जि. नांदेड) येथील उपेक्षित समाधी स्थळी भव्य व उच्च दर्जाचे स्मारक उभारण्यात यावे, या मागणीसाठी गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ पासून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर छावा मराठा संघटनेच्या वतीने बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे.

'छावा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण आणि मराठा क्रांतीचे समन्वयक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू झाले आहे. यासाठी बबन पाटील, दीपक राजूरकर व कैलास शिंदे यांनीही यात सक्रिय सहभाग घेतला आहे.



तामसा हा परिसर नेताजी पालकरांच्या जहागिरीचा व उत्तरायुषाचा भाग असल्याने या स्थळाला मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे, मात्र सध्या हे ठिकाण मूलभूत सुविधांभावी उपेक्षित आहे. या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी शासनाने तत्काळ खालील पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलकांनी उपोषणा दरम्यान केली आहे.

त्यामध्ये पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'स्मारक सल्लागार समिती' नियुक्त करावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'नियोजन आढावा समिती' स्थापन करून दरमहा बैठक घ्यावी. स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आणि पूर्वतयारीसाठी प्रकल्प व्यवस्थापन समिती तातडीने गठीत करावी आदी मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

या आंदोलनाला पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील शेकडो मान्यवर आणि सामाजिक संघटनांनी प्रत्यक्ष भेट देऊन सक्रिय पाठिंबा दर्शविला. राज्य शासन आणि पालकमंत्री अतुल सावे यांनी या संवेदनशील विषयाची गंभीर दखल घेऊन प्रशासकीय निर्णय व निधी तात्काळ उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

## विनापरवाना सावकारी करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** विनापरवाना सावकारी व्यवसाय करून नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २३ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अलीभाई टॉवर, शिवाजीनगर नांदेड येथे विनय मदनलाल भंडारी यांनी एका अर्जदाराच्या पतीस १ लाख रक्कम २.७ टक्के व्याजदराने दिली होती. त्यापैकी ६९ हजार इतकी रक्कम अद्याप येणे असल्याचे समोर आले आहे.

तपासादरम्यान संबंधिताने स्वतःच्या नावाने नवीन सावकारी परवान्यासाठी अर्ज करून अनुज्ञप्ती मिळविल्याचे सांगितले. मात्र चौकशी अधिकाऱ्यांसमोर नोंदविलेल्या जबाबात संबंधित व्यक्ती ही फायनान्स सर्व्हिसेस प्रा. लि. या रिझर्व बँकेकडे नोंदणीकृत बिगर बँकिंग वित्तीय संस्थेची भागधारक किंवा संचालक असल्याचा कोणताही उल्लेख केला नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधिताने सक्षम प्राधिकरणाची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

## चंपाबाई बोळेगावे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी) –** देगलूर तालुक्यातीलग्राम वन्नाळी येथील रहिवासी चंपाबाई नागनाथराव बोळेगावे यांचे गुरुवार, दि. १६ जुलै रोजी सकाळी ८:१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्याच रोजी सायंकाळी ५ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन सुना, नातसुना, नातवंडे असा परिवार आहे. नागनाथराव बोळेगावे यांच्या पत्नी, दिगांबर बोळेगावे, राजेश बोळेगावे यांच्या आई होत.



## तालुक्यातील अवैध दारू विक्री विरोधात महिलांचा एल्गार

### शाळा-महाविद्यालय परिसरातही अवैध दारू विक्री; शेकडो महिलांचे पोलिसांना निवेदन

**हदगाव (प्रतिनिधी) –** तालुक्यात दिवसेंदिवस अवैध दारू विक्रीचे प्रमाण वाढत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये तसेच शाळा व महाविद्यालय परिसरातही अवैध दारूची विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर गोजेगाव, वाकोडा आणि बेलमगव्हाण येथील शेकडो महिलांनी गुरुवारी हदगाव पोलीस ठाणे गाठून पोलीस निरीक्षकांकडे निवेदन सादर केले. अवैध दारू विक्री तत्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी महिलांनी केली आहे.



पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात गट ग्रामपंचायत गोजेगाव, वाकोडा व बेलमगव्हाणच्या हद्दीतील शेतजमिनीवरील एका धाब्यावर अवैधरित्या दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या धाब्यावर दिवसरात्र दारूची विक्री होत असल्याने परिसरातील महिला, शेतकरी, विद्यार्थी तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अवैध दारू विक्रीमुळे सामाजिक वातावरण बिघडत असून कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होत असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, शाळा व महाविद्यालय परिसरातही अवैध दारू सहज उपलब्ध होत असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असून, युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढण्याचा धोका असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली. शैक्षणिक परिसरात अशा प्रकारचे बेकायदेशीर व्यवसाय सुरू राहणे ही गंभीर बाब असून, त्यावर तातडीने नियंत्रण आणण्याची गरज महिलांनी अधोरेखित केली. संबंधित धाब्यावर तत्काळ छापा टाकून अवैध दारूचा साठा जप्त करावा, संबंधित व्यक्तींवर महाराष्ट्र दारूबंदी व अन्य लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी आणि हा अवैध व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, नुकतेच हदगाव पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासमोर तालुक्यातील अवैध दारू विक्री रोखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. तालुक्यात विविध भागांत सुरू असलेल्या कथित अवैध दारू विक्रीविरोधात प्रभावी मोहीम राबवून नागरिकांचा विश्वास संपादन करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'कोल्हापुरी तडका ढाब्या'वर पोलिसांचा छापा; कुंटणखाना उघड, ४ महिलांची सुटका

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेद्रे यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षने मोठी कारवाई केली. दि. १५ जुलै रोजी शिवरोडवरील विराट ढाबा उर्फ कोल्हापुरी तडका ढाबा येथे छुप्या मार्गाने चालवल्या जाणाऱ्या कुंटणखान्याचा पर्दाफाश करून ४ पीडित महिलांची सुटका करण्यात आली.

मालेगाव रोड ते खंडोबा चौकाकडे जाणाऱ्या शिवरोडवरील कोल्हापुरी तडका ढाब्याचे मालक प्रकाश अवस्थी हा परराज्यातील महिलांना आणून त्यांच्याकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती.

माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी शासकीय पंचांसमक्ष एका सामाजिक कार्यकर्त्याला बोगस गिऱ्हाईक म्हणून ढाब्यावर पाठवले. वेश्यागमनासाठी इसम निश्चित करताच बोगस गिऱ्हाईकाने पोलिसांना इशारा दिला.




त्यानुसार पोलीस पथकाने तत्काळ छापा टाकला. कारवाईत खालील संशयितांना ताब्यात घेण्यात आले. यात रूपेश सुभाष पात्रे (वय २६ वर्षे, रा. गजानन मंदिर, नांदेड – ढाबा चालक/व्यवस्थापक अटक), लहू राजू घुगे (वय २५ वर्षे, रा. नेरली, ता.जि. नांदेड – वेटर/हस्तक अटक) तर प्रकाश अवस्थी रा. नांदेड – मुख्य मालक फरार झाला.

यावेळी सदर कुंटणखान्यातून नांदेड आणि आसाम येथील एकूण ४ पीडित महिलांची सुटका करण्यात आली. आरोपी या महिलांना पैशाचे आमिष देऊन बळजबरीने वेश्याव्यवसाय करायला लावत होते. घटनास्थळावरून वेश्यागमनासाठी

### २ जणांना अटक, १ फरार

वापरण्यात येणारे साहित्य, रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ३२ हजार ३२० रुपये किमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अश्विनी गायकवाड यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३७९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा भारतीय न्याय संहितेचे कलम १४३(२) आणि अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियमचे कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेद्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, महिला पोउपनि अश्विनी गायकवाड, पोलीस अंमलदार रितेश कुलथे, मिलिंद नरबाग, ज्ञानोबा कवठेकर, दासरे, गायकवाड, देवकत्ते, मोरे, मपोकॉ केंद्रे यांनी यशस्वी केली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com